मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
इ० १५३ सन १८९५
ले० नागोजीराव पाटणकर
पु० क्षात्रवंश सागर

डॉ.

श्री.

# क्षात्रवंशसागर.

हा ग्रंथ

नागोजीराव पाटणकर यांणीं,

वे० रा० बाळशास्त्री तोरो,

यांच्या साहाय्यानें तयार केला,

तो कोल्हापूर येथें

"विद्याविलास" छापखान्यांत छापिला

( या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारची मालकी, वे० रा० बाळशास्त्री तोरो यांजकडे पुस्तककर्त्यांनीं सोपविली आहे )

शके १८१६, सन १८९५.

किंमत ८ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

सं. ३. २१७
मराठी ग्रंथ संग्रहालय

# अनुक्रमणिका.

विषयांचीं नांवें. पृष्ठांक.


१ मंगलाचरण .... .... .... .... १
२ प्रस्तावना .... .... .... .... १
३ श्री सूर्यवंशीय क्षत्रियराजावली .... .... ३
४ मेवाडच्या राण्याचा वंश .... .... .... ५
५ अजयसिंग ( शिवाजी छत्रपतीचा मूळ पुरुष ) याचा वंश .... ६
६ सातारा व कोल्हापूर घराण्यांचा वंशवृक्ष .... .... ८
७ क्षत्रियांनीं आचरण करणेचे धर्म .... .... १०
८ सार्वजनिक धर्म .... .... .... .... १०
९ श्री चंद्रवंशीय क्षत्रिय राजावली .... .... ११
१० यदुवंश .... .... .... .... ११
११ सोमशर्मा राजाचा वंश .... .... .... १५
१२ कृष्णादि शूद्र राजे यांचा वंश .... .... १६
१३ परीक्षितिराजवंश .... .... .... १७
१४ रजपूत लोकांचे मुख्य वंश ( जातकुळी ) .... १९
१५ गेहलोट वंशवर्णन .... .... .... २०
१६ गेहलोट शाखाभेद .... .... .... २१
१७ यदुवंश व शाखाभेद .... .... .... २२
१८ जाडेजाकुल .... .... .... .... २३
१९ तुवरवंश .... .... .... .... २४
२० राठोडवंश व शाखाभेद .... .... .... २४
२१ कच्छवाहवंश .... .... .... .... २६
२२ अग्निकुळें ( परमार )वंश .... .... .... २६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ परमारचे शाखाभेद | .... | .... | .... | | २७ |
| २४ चव्हाणवंश | .... | .... | .... | .... | २८ |
| २५ चव्हाण याचे शाखाभेद | .... | .... | .... | | ३० |
| २६ चालुक्य ऊर्फ सोळंखीवंश | .... | .... | .... | | ३१ |
| २७ चालुक्यशाखाभेद | .... | .... | .... | | ३३ |
| २८ परिहारवंश | .... | .... | .... | .... | ३४ |
| २९ चावडेवंश | .... | .... | .... | .... | ३५ |
| ३० टाकवंश | .... | .... | .... | .... | ३६ |
| ३१ जितवंश | .... | .... | .... | .... | ३७ |
| ३२ हूणवंश | .... | .... | .... | .... | ३७ |
| ३३ काठीवंश | .... | .... | .... | .... | ३७ |
| ३४ बालावंश | .... | .... | .... | .... | ३८ |
| ३५ झालावंश | .... | .... | .... | .... | ३८ |
| ३६ जेठवावंश | .... | .... | .... | .... | ३८ |
| ३७ गोहेलवंश | .... | .... | .... | .... | ३८ |
| ३८ सारवियावंश | .... | .... | .... | .... | ३९ |
| ३९ शिलारवंश | .... | .... | .... | .... | ३९ |
| ४० दाबीवंश | .... | .... | .... | .... | ३९ |
| ४१ गोहरवंश व शाखाभेद | .... | .... | .... | | ३९ |
| ४२ दोडावंश | .... | .... | .... | .... | ३९ |
| ४३ गेहेरवाळवंश | .... | .... | .... | .... | ४० |
| ४४ बीरगुजरवंश | .... | .... | .... | .... | ४१ |
| ४५ सेंगारवंश | .... | .... | .... | .... | ४१ |
| ४६ सिकरळवंश | .... | .... | .... | .... | ४१ |
| ४७ बैसवंश | .... | .... | .... | .... | ४१ |

४८ दाहियावंश .... .... .... .... ४१
४९ जोहियावंश .... .... .... .... ४१
५० मोहिलवंश .... .... .... .... ४२
५१ निकुंपावंश .... .... .... .... ४२
५२ राजपालीवंश .... .... .... .... ४२
५३ दाहिमावंश .... .... .... .... ४२
५४ अलीकडील मराठे यांचें गोत्र व कुल .... .... ४३

## गोत्र व जातिभेद.

५५ चव्हाण .... .... .... .... ४३
५६ मोरे .... .... .... .... ४३
५७ पवार .... .... .... .... ४४
५८ राष्ट्रकुंड .... .... .... .... ४४
५९ धामपाळ .... .... .... .... ४५
६० अहीरजाधव .... .... .... .... ४५
६१ कदम .... .... .... .... ४६
६२ निकम .... .... .... .... ४६
६३ धीकट .... .... .... .... ४७
६४ काळमुखी .... .... .... .... ४७
६५ शेलार .... .... .... .... ४७
६६ प्रोकट .... .... .... .... ४८
६७ ब्रह्मवंश .... .... .... .... ४८
६८ चुलकिया .... .... .... .... ४८
६९ दारीक .... .... .... .... ४९
७० चांदेलवीर .... .... .... .... ४९
७१ अनंगवीर .... .... .... .... ५०

७२ हरुबोवडा .... .... .... .... ५०
७३ धर्मराज .... .... .... .... ५०
७४ शिंदे.... .... .... .... .... ५१
७५ कटक .... .... .... .... ५१
७६ करटपाळादि .... .... .... .... ५२
७७ चंद्रवंशीय राजांचीं गोत्रें व कुलदेवता .... .... ५२
७८ वसिष्ठाची राजे लोकांस अनुज्ञा .... .... ६०
७९ धर्मसिंधूतील क्षत्रियगोत्राबद्दल प्रमाण .... .... ६१
८० मराठ्यांची शहाण्णव कुळीची नामावळी.... .... ६१
८१ सूर्यवंशीय राजांचीं गोत्रें व कुलदेवता .... .... ६२
८२ चंद्रवंशीय राजांच्या गोत्राची व कुलदेवतेची नामावली ६३
८३ अलीकडील मराठे मंडळींचीं आडनांवें .... .... ६४
८४ उपसंहार. .... .... .... ६८

श्री.

# मंगलाचरणम्.

अविरलमदजलनिवहं भ्रमरकुलानीकसेवितकपोलम् ।
अभिमतफलदातारं कामेशं गणपतिं वंदे ॥ १ ॥
सानंदं प्रणिपत्य सिद्धिसदनं लंबोदरं भारतीं
सूर्यादिग्रहमंडलं निजगुरुं भक्त्या हृदब्जेस्थितम् ।
येषामंघ्रिसरोरुहस्मरणतो नानाविधाः सिद्धयः
सिद्धिं यांति लघु प्रयांति विलयं प्रत्यूहशैलव्रजाः ॥ १ ॥

# प्रस्तावना.

या जगतीतलाचे ठिकाणीं, राणे ( रजपूत ) व मराठे यांचीं बरींच कुळें आहेत. यांचा मूळपासून ह्मणजे ब्रह्मदेवापासून संबंध पाहिला असतां, हे क्षत्रियकुलोत्पन्न असावेत, असें, श्रीमद्भागवतादि ग्रंथ व आंग्लेतिहास यांवरून वाटतें. तर क्षत्रियांना आपलें गोत्र, वेद व क्षात्रधर्म वगैरे विदित असणें अगदीं अवश्य आहे. कारण, सूर्यकुलोत्पन्न श्रीरामचंद्र हे वसिष्ठगोत्री यजुर्वेदी होते, असें वाल्मीकिरामायणांत लिहिलें आहे. तसेंच सोमवंशीय श्रीकृष्ण हेही वसिष्ठगोत्री यजुर्वेदीच होते, असें भविष्योत्तरपुराणीं व्यंकटेशमाहात्म्यीं लिहिलें आहे. तर ह्या प्रमाणांवरून क्षत्रियांस, पूर्वींपासून गोत्रें वगैरे आहेत असें सिद्ध होतें; परंतु कलियुगाच्या प्रबलतेमुळें, बहुतकरून "स्वधर्मत्यागच होत चालला आहे. त्यायोगानें, गोत्रादिसंभव होणें हें साहजिकच आहे. मग आपण सूर्यवंशज किंवा चंद्रवंशज किंवा ब्रह्मवंशज आहों, हें विदित असणेंही अनुपपत्तीच वाटते. लग्नकार्याचेवेळीं वधूवरांचें गोत्र व कुल

( वंश ) माहित असणें किंवा माहित करून घेणें हें अवश्य आहे; परंतु प्रस्तुत गोत्रादिकाचा व वंशाच्या माहितीचा बराच ऱ्हास होऊन, गोत्रांतले गोत्रांत ( अशास्त्र ) विवाह होणेचा प्रसंग आलेला पाहून, मीं आपले संस्थानचे परंपरागत आश्रित वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बाळशास्त्री वासुदेवशास्त्री तोरो ( पौराणिक ) यांचे व रा० रा० अमृतराव वाघोलकर यांचे साहाय्यानें, हा **क्षात्रवंश-सागर** नांवाचा ग्रंथ, अतिशय परिश्रमानें व श्रीमद्भागवतादिग्रंथ, इतिहास व कांहीं लेखी जुने ग्रंथ यांचे आधारानें तयार केला आहे. या ग्रंथांत, सूर्यवंश व चंद्रवंश या उभयवंशांचा शाखाभेद व वंशसंबंधीं उपयुक्त माहिती बरीच विस्तृत लिहिली आहे. आह्मांस शोध लागल्याप्रमाणें, किंचित् गोत्रभेदही लिहिला आहे. तर सर्व जात्यभिमानी लोकांनीं लग्नकार्याचे वेळीं, वर ( नवरा ), व वधू ( नवरी ) यांचा वंश, शाखा व गोत्र यांचा पूर्ण शोध करून विवाह करावा. ह्मणजे तो सशास्त्र व सर्वांस कल्याणकारक होईल. अशा विचारानें हा ग्रंथ आह्मीं तयार केला आहे. आतां, वंशावळींत अनेक ग्रंथमतानें व अपभ्रंशानें नांवांचा झालेला भेद दुरुस्त केला आहे; परंतु गुणग्राहक मंडळी या ग्रंथामध्यें न्यूनाधिक झालें असेल तें, 'हंसक्षीर' न्यायानें गुणच घेतील अशी आशा आहे. क्षत्रियांचीं गोत्रें व शाखा यांजबद्दलची माहिती, कोणांस शोधांतीं याहिपेक्षां विशेष कळल्यास, त्यांणीं कृपाकरून ती कळविणेची मेहरबानी करावी. ह्मणजे आह्मीं कारणपरत्वें दुसरी आवृत्ति काढल्यास, त्यांत त्या माहितीचा अवश्य उपयोग करून घेऊं.

**नागोजीराव पाटणकर.**

श्री.

# क्षात्रवंशसागर.

श्रीसूर्यवंशाची क्षत्रिय राजावली, ब्रह्मदेवापासून शा० शके १७९६ पर्यंत राण्याच्या वंशास सरळ मिळाली आहे. ती क्षत्रिय राजवंशावली क्रमानें खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. ही वंशावली श्रीमद्भागवत, हरिवंश, इंग्रजी इतिहास ( राजस्थान ) व सह्याद्रिखंड वगैरे ग्रंथांच्या आधारें लिहिली आहे.

१ ब्रह्मा, २ मरीचि, ३ कश्यप, ४ विवस्वान् ( सूर्य ), ५ वैवस्वतमनु, ६ इक्ष्वाकु वगैरे ( १० मुळगे ), ७ विकुक्षी वगैरे ( १०० मुलगे. विकुक्षिरेव शशादः ), ८ काकुत्स्थ ( सएव पुरंजयः इंद्रवाहः), ९ अनपृथु, १० विश्वगंधी, ११ आर्द्रा, १२ युवनाश्व, १३ श्रवस, १४ वृद्धश्रवा, १५ धुंधुमार, १६ दृढाश्व, १७ हर्यश्व, १८ निकुंप, १९ वरुणाश्व, २०सेनाजित्, २१ युवनाश्व, २२ मांधाता, २३ पूरकुच्छ, २४ अरुण, २५ त्रिविधन्वा, २६ अत्रारुण, २७ सूतवृथ, २८ त्रिशंकु, २९ हरिश्चंद्र (सत्यवान्), ३० रोहिदास, ३१ हारित, ३२ चंपा (चंपापूर यानें वसविलें ), ३३ विजय, ३४ बरुक ( असित, रामायणांत ), ३५ वृक्ष, ३६ बाहुक, ३७ सगर, ३८ केशी, ३९ असमंजस, ४० अंशुमान्, ४१ दिलीप, ४२ भगीरथ, ४३ श्रुतसेन, ४४ नवाद्य, ४५ अंबरीष, ४६ सिंधुद्वीप, ४७ अयुतायु, ४८ ऋतुपर्ण ( नलसखा ) ४९ सर्वकर्मा ( नळ ), ५० सुदास, ५१ अश्मक, ५२ मूळक, ५३ सत्वरित ( दशरथ ), ५४ ऐद्वोर ( ऐडबिड ), ५५ विश्वसह,

५६ खरभंग ( खट्वांग ), ५७ दीर्घबाहु, ५८ दिलीप, ५९ रघु, ६० अज, ६१ दशरथ, ६२ रामचंद्र, ६३ *कुश, ६४ अतिथी, ६५ निषध, ६६ नभ ( नळ ), ६७ पुंडरीक ( पुगुळिक ), ६८ क्षेमधन्वा ( मेवधन ), ६९ देवानीक, ७० अनीह, ७१ पारियात्र, ७२ बलस्थल ( दळ, शूळ ), ७३ वज्रनाभ ( सूर्यसंभव ), ७४ खगण ( विजिताश्व ), ७५ विधृति, ७६ हिरण्यनाभ, ७७ पुष्पक, ७८ ध्रुवसंधि, ७९ सुदर्शन, ८० अग्निवर्ण, ८१ शीघ्र, ८२ $ मरु, ८३ प्रसुश्रुत, ८४ संधि, ८५ अमर्षण, ८६ महस्वान्, ८७ विश्वसाव्ह, ८८ प्रसेनजित्, ८९ तक्षक, ९० बृहद्बळ, ९१ बृहद्रण, ९२ उरुक्रिय, ९३ वत्सवृद्ध, ९४ प्रतिव्योम, ९५ भानु, ९६ दिवाकर, ९७ सहदेव, ९८ बृहदश्व, ९९ भानु ( ब्राह्मण ), १०० प्रतीकाश्व, १ सुप्रतीक, २ मरुदेव, ३ सुनक्षत्र, ४ पुष्कर, ५ अंतरिक्ष, ६ सुतपा, ७ अमित्रजित्, ८ बृहद्राज, ९ बर्हि ( बारिकेतु ), ११० कृतंजय ( हा कोसलदेश व अयोध्या सोडून सोरटदेशीं गेला ), ११रणंजय, १२ संजय, १३ शाक्य, १४ शुद्धोद ( सुदीप ), १५ लांगल ( संगल ), १६ प्रसेनजित्, १७ क्षुद्रक, १८ रणक ( रोमिक, कंडक ), १९ सुरथ ( सूरित ), १२० ¶ सुमित्र,

* भागवतीं कुशाचा पुत्र अतिथी असें आहे; परंतु इंग्रजी इतिहासांत लवाचा मुलगा अतिथी असें आहे, आणि कुशाचा कच्छवाहादिकवंश.

$ हा कलीच्या अंतीं नष्ट सूर्यवंशास उत्पन्नकर्ता होणार.

¶ सुमित्रापर्यंत राजे भागवतीं आहेत. याचे राज्याचेवेळीं विक्रमादित्य शककर्ता होता, असें इतिहासावरून कळतें. पुढील राजे इंग्लिश इतिहासावरून लिहिले आहेत. याचेवेळींच पंडुवंशांतील राजपाल राज्य करीत होता. लवापासून हा राजा २७वा आहे; परंतु इतिहासांत २४वा लिहिला आहे. आमचेकडे एक जुनें पुस्तक आहे. त्यांत सुमित्राला ७ पुत्र झाले असें लिहिलें आहे. त्यांचीं नांवें:— १ कदम, २ निकम, ३ धाटक, ४ काळमुगी, ५ शेलार, ६ प्रोकट, ७ प्रतिहार. यांचपासून पुढे ९६ कुळें झालीं. श्री० हिंमतबहादर चवाण यांचे पुरोहित पुरुषोत्तमशास्त्री भाळवणीकर यांचे लेखी जुने पुस्तकांतही असेंच लिहिलें आहे.

( १२१ पासून १२५ पर्यंत मधलीं पांच नांवें न मिळाल्यामुळें, येथें दिलीं नाहींत. )

## मेवाडच्या राण्याचा वंश.

२६ महारित, २७ अंतरित, २८ अचलसेन, २९ कनकसेन ( यानें सौराष्ट्र देश जिंकिला. विक्रम संवत् २०० ह्मणजे इसवी सन १४४ ) ३० महामदसेन, ३१ सुदंत, ३२ विजय ( अजयसेन. यालाच जयसिंग राजा, नसिरवान असें ह्मणत असे. याणें सौराष्ट्रांत विराटगृहनामक शहर बांधिलें, व विक्रम संवत् ३७५ ह्मगजे इ० स० ३१९ मध्यें वल्लभी शक स्थापिला. विजयपूर बांधिलें. ), ३३ पद्मादित्य, ३४ शिवादित्य, ३५ हरादित्य, ३६ सूर्यादित्य, ३७ सोमादित्य, ३८ शिलादित्य ( हा युद्धांत मारला ), ३९ केशव, गोप, ग्रहादित्य ( हा भांडार अरण्यांत पळून गेला ), ४० नागादित्य ( याच्या जातीला गेहलोट असें ह्मणतात ), ४१ भागादित्य, ४२ देवादित्य, ४३ आशादित्य ( याणें अहार प्रांतीं अशपूर शहर वसविलें. हें शहर गेहलोट याचे राजधानीचें होतें. ), ४४ खलाभोज, ४५ ग्रहादित्य, ४६ बापारावळ ( हा चितोड येथें विक्रम संवत् ७०७ ह्मणजे इ० स० ७१४त धरला. हा दाशरथी रामापासून ८०वा पुरुष होता. ) ४७ अपराजित ( तृतीयपाद, मेहंमदकासम. ), ४८ काळभोज ( ८०९ हारून अलरशीद. ) ४९ नंदकुमार ( ८१५ अलपतेगीन. ) १५० खुमाज ( ८३५. १ अलमायून, २ सवक्तेगीन चितोडावर हल्ला. ) ५१ योगिराज, ५२ भर्तृभटशिंग, ५३ उलथ, ५४ शक्तिकुमार ( ८५५ ), ५५ उबापिसाव, ५६ नरवाहन, ५७ सलवाहन, * ५९ नरवर्मा ( ९९० ), ६० यशोवर्म ( १०२० महंमद गिजनवी. ),* ६३ साम-

---

* १५८ व १६१ व १६२ या नंबरचीं नांवें न मिळाल्यामुळें दिलीं नाहींत.

रसी ( ११४७ शहाउद्दीन गोवी इ० स० ११९३त झालेल्या मुस-सलमानाशीं पृथ्वीराजाचे लढाईत मेला. ), ६४ कर्ण गेहलोट रावळ, ६५ राणा रहुप सिसोदिया ( १२०१ कुतुबुद्दीन याणें रावळ पद बदलून, त्या ठिकाणीं राणा हें पद चालू केलें. ( १६६ पासून १७१ पर्यंत मधलीं सहा नांवें न मिळाल्यामुळें, येथें दिलीं नाहींत. )

## चितोडचा राजा.

७२ पृथ्वीमल्ल, ७३ भुन्सी, ७४ चंद्र ( दिल्लीचा राजा. बंधु भीमसिंग. ),
७५ लक्ष्मणसिंग ( लखमसी १२७५—अल्लाउद्दीन—चितोडावर गर्दी व पद्मिणीराणीचे संबंधानें धामधूम. चितोड येथें पहिला जोहार.

७६ ऊरासिंग,
७७ हमीर ( १३०१ यानें १३१३त चितोड परत घेतलें.
७८ खेतसी ( क्षेत्रसिंह १३६५ दक्षिणेंत आला. )
७९ लाखाराणा ( १३८३. )
८० मोकलजी ( १३९८ तैमूरलंग. )
८१ कुंभोराणा ( १३१९ याची स्त्री मिराबाई. यास याचे पुत्रानेंच मारिलें. )
८२ उदाराणा ( हत्यारी १४६९. )
८३ रावमल्ल ( इ० स० १४७४. )
८४ संगराणा ( १५०९ बाबर—बाबानानकाचा उदय. )

अजयसिंग
१ सज्जनसिंग
२ दिलीपजी.
३ शिवाजी.
४ भोराजी.
५ देवराज.
६ उग्रसेन.
७ मालूजी. *
८ खेलूजी.
९ जनकोजी.
१० सठवाजी.

* ८।९।१० हे मालोजीचे बंधु असावेत.

८५ रत्नसिंग ( १५३०. )

८६ विक्रमजित् ( १५३५ चितोडावर गुजराथचे बहादूरशहाची गर्दी. चितोड येथें दुसरा जोहार. तें पुनः राण्यानें घेतलें. )

११ शहाजी.*
|
१२ शिवाजी
( छत्रपति. )

८७ बनवीर ( नागपूरचे भोसल्याचा मूळ पुरुष. ) ८८ उदेसिंग ( १५४१ अकबर १५६७ चितोड घेतलें. चितोड येथें तिसरा जोहार. ) ८९ प्रतापसिंग ( १५७२ उदेपूर वसविलें. कुमळमेवास राहिला. मोंगलाशीं सोयरीक केली नाहीं: हळदी घाटाची लढाई. ) ९० अमरसिंह ( १५९७ शहाजानास शरण गेला, चितोड घेतलें. ) ( उमरा ) ह्या राजापर्यंत इतिहास सांपडतो. ९१ कर्णसिसोदिया ( १६२१ याचे वंशास सुळोंखे ह्मणजे साळोखे ह्मणतात ), ९२ जगत्सिंग ( हा राजा फलटणचा देशमुख, यालाच लिंबाळकर ह्मणतात. याची बहीण दीपाबाई हिणें मालूजी भोसले यांस वरिलें. ) ९३ राजसिंग ( १६५४ यानें जोधपूरची राजकन्या जेजिया इला औरंगजेब नेत होता, तिला हिरावून घेतली. ) ९४ जयसिंग ( १६८१ ), ९५ अमरसिंग ( २रा १७०० ), ९६ संग्रामसिंग ( १७१६ ), ९७ जगत्सिंग ( २रा १७३४ मल्हारजी होळकर याची गर्दी. ), ९८ प्रतापसिंग ( २रा १७५२ जनकोजी शिंदे व रघुनाथराव पेशवे यांची गर्दी. ), ९९ राजसिंग ( २रा १७५५. ), २०० ऊरसिंग ( २रा १८६२ मारला गेला. ) १ हमीर ( २रा दिवाण अमरचंद. १७७२ ) २ भीमसिंग ( १७७८ कृष्णाकुमारी कन्या. अमीरखान व महादजी शिंदे यांच्या लढाया. इंग्रजाशीं तह. ) ३ जवानसिंग ( १८२८. ) ४ सरदारसिंग ( १८३८. )

---

* ११वा हा मालोजीचा मुलगा होय.

५ सुरूपसिंग ( १८४२. ) ६ शंभुसिंग ( १८६१ हा मुलगा लहान होता, ह्मणून पोलिटिकल एजंट कर्नल ईडन यांणीं इ० स० १८६४ पर्यंत कारभार पाहिला, व पुढें १८६५त राणा गादीवर बसला. दत्तकाची सनद. ) ७ सज्जनसिंग ( २रा १८७४ सत्रा तोफांची सलामी. )

पहिला सज्जनसिंग याच्या वंशांतील मालोजी याचा वंशवृक्ष खालीं दाखविल्याप्रमाणें. या सज्जनसिंगाचा सरळवंश ६ वे पृष्ठावर दिला आहे. सज्जनसिंग हा मेवाड सोडून पित्राज्ञेनें दक्षिणेंत आला. त्याचेच वंशांत मराठ्यांचा राज्यस्थापक शिवाजी झाला.

## सातारा व कोल्हापूर घराण्याचा वंशवृक्ष.

मालोजी भोसले ( मूळपुरुष ).

- शाहाजी
  - शिवाजी (मराठी राज्याचा स्थापक).
    - सातारा
      - संभाजी
        - शाहू
          - रामराजा
            - ....
      - राजाराम
        - कोल्हापूर
          - शिवाजी
            - रामराजा
              - ....
          - १ संभाजी
            - २ शिवाजी
              - ....
- शरीफजी
  - त्र्यंबकजी
    - व्यंकोजी
      - माणकोजी
        - शाहाजी
          - खानवटकर
            - माणकोजी
              - ....
            - संभाजी
              - रामचंद्रराव

# कोल्हापूर घराण्याचा वंशवृक्ष

मागील पृष्ठावरून पुढें चालू.

नारायणराव
(मागील पृष्ठावरील आठवा.)
|
दिनकरराव
|
नारायणराव

२ शिवाजी
- ३ संभाजी (आबासाहेब)
- ४ शहाजी (बुवासाहेब)
  - ५ शिवाजी (बाबासाहेब)
    - ६ राजाराम
      - ७ शिवाजी
        - ८ शाहू
          - राधाबाईआक्का
  - आऊबाईआक्का (दादासाहेब पाटणकर यांची पत्नी)
    - नागोजीराव
  - शाहू (चिमासाहेब)
  - बाळाबाई (नानासाहेब घाटगे यांची पत्नी)
    - दत्ताजीराव घाटगे (जयसिंगराव घाटगे कागलकर)
      - यशवंतराव

## क्षत्रियांनीं आचरण करणेचे धर्म.

### भागवत स्कंध ७ अ० ११ श्लोक २२.

१ शौर्य, २ वीर्य, ३ धृति, ४ तेज, ५ त्याग, ६ आत्मजय, ७ क्षमा, ८ ब्रह्मण्यता, ९ प्रसाद, १० रक्षण ( हीं क्षत्रियांचीं लक्षणें ).

## सर्व मनुष्यांनीं आचरण करणेचा धर्म.

### भागवत स्कंध ७ अ० ११ श्लोक ८.

१ सत्य, २ दया, ३ तप, ४ शौच, ५ तितिक्षा, ६ ईक्षा, ७ शम, ८ दम, ९ अहिंसा, १० ब्रह्मचर्य, ११ त्याग, १२ स्वाध्याय, १३ आर्जव, १४ संतोष, १५ समदृक्सेवा, १६ ग्राम्येहोपरम, १७ विपर्ययेहेक्षा, १८ मौन, १९ आत्मविमर्शन, २० अन्नादेःयथार्हतःभूतेभ्यःसंविभागः, २१ भूतेषु आत्मदेवताबुद्धिः, २२ श्रवण, २३ कीर्तन, २४ स्मरण, २५ सेवा, २६ अर्चन, २७ नमन, २८ दास्य, २९ सख्य, ३० आत्मसमर्पण ( हे ३० धर्म सर्व मनुष्यांनीं आचरण करणेचे आहेत ).

श्री.

स. २ ... ४९०७

श्रीचंद्रवंशाची क्षत्रिय राजावली. ब्रह्मदेवापासून जे राजे झाले, त्यांचीं नांवें खालीं लिहिलेप्रमाणें.—ही वंशावली श्रीमद्भागवत, हरिवंश, इंग्रजी इतिहास ( राजस्थान ) वगैरे ग्रंथांच्या आधारानें लिहिली आहे.

आदिनारायण

१ ब्रह्मदेव

२ अत्रि

३ चंद्र ( अत्रीपासून चंद्राची उत्पत्ति. श्रीमद्भागवतीं स्कंध ४ अध्याय १ यांत अशी लिहिली आहे कीं, ब्रह्मदेवाच्या अंशानें चंद्र हा अत्रीपासून झाला. तसेंच हरिवंशीं अध्याय २५ श्लोक ६ यांत चंद्राची उत्पत्ति अत्रीच्या नेत्रापासून झाली असें आहे व श्रीमद्भागवत नवमस्कंधीं असेंच आहे. )

४ बुध ( बुध हा चंद्रापासून बृहस्पतीची स्त्री तारा इचे ठिकाणीं जन्मला, असें भागवत व हरिवंश यांमध्यें आहे. )

५ पुरूरवा ( हा बुधापासून सूर्यवंशांतील इला इजला झाला. याची राजधानी प्रतिष्ठान नगर ह्मणजे पैठण. )

६ आयु

७ नहुष

८ ययाति ( याला पांच पुत्र—यदु, तुर्वसु, द्रुह्यु, अनु आणि पुरु असे होते. ) पैकीं तुर्वसु, द्रुह्यु, व अनु यांचा वंश येथें देणेची विशेष गरज नसल्यानें दिला नाहीं.

यदूला दोघे मुलगे. १ सत्यजित् आणि २ क्रोष्टा. त्यांचा वंश खालीं दिल्याप्रमाणें :—

१ *सत्यजित्, २ सहस्रजित्, ३ हैहय, ४ धर्म, ५ नेत्र, ६ कुंति-

* स्थलसंकोचामुळें, एक वंशस्थ पुरुष एकाखालीं एक न देतां, एकापुढें एक दिले आहेत.

राज, ७ सोहंजि, ८ महिष्मान्, ९ भद्रसेन ( याला धनक आणि दुर्मद असे दोन पुत्र होते. दुर्मदाचा वंश नाहीं. ), १० धनक, ११ कृतवीर्य, १२ *सहस्रार्जुन. याला पांच पुत्र. तेः—१ जयध्वज, २ वृषभ, ३ शूरसेन, ४ मधु, ५ उर्जित. (पैकीं २ रा वृषभ आणि ५ वा उर्जित यांचा वंश नाहीं ). १ ला जयध्वज याचा वंशः—१ जयध्वज, २ तालजंघ, ३ वीतिहोत्र. ( तालजंघाला वीतिहोत्रादि १०० पुत्र झाले, ते मौर्वतेजानें नष्ट झाले. ) ४ था मधु याचा वंशः—१ मधु, २ वृष्णि. ३ रा शूरसेन याचा वंशः—१ शूरसेन, २ सूर्य, ३ द्रष्टा, ४ कृष्ण, ५ ज्याध्वज, ६ कुच, ७ यांग, ८ तात्यांग, ९ भीतोत्र, १० हृशित, ११ यवन, १२ दुर्जय. ( यदुवंशापैकीं शतजितापासून दुर्जयापर्यंत सरळ वंश सांपडला आहे, पुढें उपलब्ध नाहीं. )

१ क्रोष्टा ( यदूचा दुसरा मुलगा, याचा वंश ), २ वृजिन्वान्, ३ श्वाहि, ( स्वाप ) ४ उशेकुः, ५ चित्ररथ, ६ शशबिंदु, ७ पृथुश्रवा, ८ रुचक, ९ पुरुजित्, १० ज्यामघ, ११ विदर्भ. याला ३ पुत्र होते. तेः—१ कुश, २ क्रथ, ३ रोमपाद. पैकीं कुश याचा वंश नाहीं. ३ रा पुत्र रोमपाद याचा वंशः—१ रोमपाद, २ बभ्रु, ३ कृती, ४ उशिक, ५ चेदी, ६ शिशुपाल. ( पुढें वंश उपलब्ध नाहीं ). २ रा मुलगा क्रथ याचा वंशः—१ कुंति, २ धृति, (धृष्टि) ३ निर्वृति, ४ दशार्ह, ५ व्योम, ६ जीमूत, ७ विकृति, ८ भीमरथ, ९ नवरथ, १० दशरथ, ११ शकुनि, १२ करंभि, १३ देवरात, १४ देवक्षत्र, १५ मधु, १६ कुरवश, १७ अनु, १८ पुरुहोत्र, १९ आयु, २० सात्वत, ( याला १ अंधक व २रा भजमान असे

---

* याणें दत्तात्रेयापासून योगमार्ग संपादन केला. सार्वभौमराज्य केलें. त्यास १,००० पुत्र होते, पैकीं ५ जीवंत राहिले. याच्या स्मरणानें गतवस्तु प्राप्त होते असें भागवतीं व हरिवंशीं लिहिलें आहे.

दोन पुत्र होते. अंधक याचा वंशः—१ अंधक, २ कुक्कुर, ३ वन्हि, ४ विलोम, ५ कपोतरोमा, ६ अनु, ७ अंधक, ८ दुंदुभि; ९ अरिद्योत, १० पुनर्वसु, ११ आहुक, १२ उग्रसेन, १३ कंस. ( स्कंध ९ अ० २४ श्लोक २४ येथपर्यंत हा वंश मिळाला, पुढें उपलब्ध नाहीं. ) भजमान याचा वंशः—१ भजमान, २ विदूरथ, ३ शूर, ४ शिनी, ५ स्वयंभोज, ६ हृदिक, ७ देवमीढ, ८ शूरसेन, ९ वसुदेव, १० श्रीकृष्ण, ११ प्रद्युम्न, १२ अनिरुद्ध, १३ वज्र, १४ प्रतिबाहु, १५ सुबाहु, १६ शांतसेन, १७ शतसेन. हे राजे भागवत दशम उत्तरार्ध अ० ९त सांपडले. पुढें वंश उपलब्ध नाहीं. )

१ पुरु, ( ययातीचा ५ वा मुलगा याचा वंश. ) २ जन्मेजय, ३ प्रचीन्वान्, ४ प्रवीर, ५ नमस्यु ( हिनाश्व ), ६ चारुपद, ७ सुद्यु, ८ बहुगव, ९ संयाति, १० अहंयाति, ११ रौद्राश्व, १२ ऋतेयु, १३ रंतिभार ( रतिनव ), १४ सुमति, १५ रैभ्य, १६ दुष्यंत, १७ भरत, १८ वितथ ( भरद्वाज ), १९ मन्यु, २० बृहत्क्षेत्र, २१ हस्ती ( यानेंच हस्तनापूर शहर वसविलें. ), २२ अजमीढ. याला शांत, यान, ऋक्ष व बृहदिषु असे चार पुत्र. यांपैकीं पहिला शांत याचा वंश पुढें दिल्याप्रमाणें आहे.—१ शांत ( नील ) २ सुशांत, ३ पूर्यश्व, ४ वाजाश्व ( याला १ मोकिल, ( सुमित्र ) २ श्रीनज, ३ बृहदश्व, ४ यवीनर, ५ कांपिल्य असे पांच पुत्र होते. पैकीं मोकिलाचा वंश आहे.) तो—१ मोकिल, २ * दिवोदास, ३ मित्रेयु, ४ च्यवन, ५ सुदास, ६ सहदेव, ७ सोमक, ८ पृषत्, ९ द्रुपद, १० धृष्टद्युम्न, ११ धृष्टकेतु, ( याचा वंश पुढें उपलब्ध

---

* हा राजा काशीक्षेत्र येथें राज्य करीत होता. याचेच वंशज गेहरवाळकुळ हे होत. हे राजे बुंदेलखंडांत राज्य करीत होते.

नाहीं ). अजमीढाचा दुसरा मुलगा यान त्याचा वंश :—१ यान, २ अजकुश, ३ कुश, ४ बालकुश, ( याला १ कुशिक व २ कुशांब असे दोन पुत्र होते. पैकीं कुशिक याचा वंश आहे. ) तो— १ कुशिक, २ गाधी, ३ विश्वामित्र, ४ देवरात ( याला संशिपा व आस्तीक असे दोन पुत्र होते. यांचा वंश पुढें उपलब्ध नाहीं. ) अजमीढाचा तिसरा मुलगा ऋक्ष त्याचा वंश. — १ ऋक्ष, २ संवरण, ३ *कुरु. याला १ सुधनु, २ परीक्षित्, ३ जन्हु असे तीन पुत्र होते, त्यापैकीं सुधनु याचा वंश पुढें दिल्याप्रमाणें :— १ सुधनु, २ सुहोत्र, ३ च्यवन, ४ कृती, ५ वसु ( विश्रिथ ), ६ उपरिचर, ७ बृहद्रथ ( याला जरासंध हा मुलगा होता. ), ८ कुशाग्र, ९ ऋषभ, १० सत्यहित, ११ पुष्पवान्, १२ जह्नु, ( याचा वंश पुढें उपलब्ध नाहीं. ) कुरूचा दुसरा मुलगा १ परीक्षित ( अनपत्य ).

जरासंध (बृहद्रथ पुत्राचा वंश) २सहदेव, ३ ‡मार्जारी, ४ सोमापी, ५ श्रुतश्रवा, ६ अयुतायु, ७ निरामित्र, ८ सुनक्षत्र, ९ बृहत्सेन, १० सेनजित् ( कर्मजित् ), ११ श्रुतंजय, १२ विहर ( विप्र ), १३ शुचि, १४ क्षेम, १५ सुव्रत, १६ धर्मसूत्र, १७ सुशर्मा, १८ दयुमत्सेन, १९ सुमति, २० सुबल, २१ सुनीथ, २२ सत्यजित्, २३ विश्वजित्, २४ †रिपुंजय ( पुरंजय ), २५ ¶ प्रद्योत (प्रीतोदन ),

---

* कुरुक्षेत्राचा अधिपति.

‡ हा परीक्षिताशीं समकालीन होता. त्यावेळींच कलियुगास आरंभ झाला. या राजापासून रिपुंजयापर्यंत २० राजांनीं १,००० वर्षें राज्य केलें.

† याचेवेळीं कलियुगाचीं १,००० वर्षें झालीं होतीं. या रिपुंजयाला त्याच्या शनक नांवाच्या अमात्यानें ठार मारून, आपला मुलगा प्रद्योत याला राजा केला. रिपुंजय हा चंद्रवंशांतील शेवटचा पुरुष होय. कलियुगीं चंद्रवंश, विजातीय वर्णसंकर होऊन पुष्कळ काळ राहणार आहे, असें भागवत स्कंध १२ अ० १ यांत वर्णिलें आहे.

¶ प्रद्योतापासून ५ राजांनीं १३८ वर्षें राज्य केलें.

२६ पालक, २७ विशाखयूप, २८ राजक, २९ नंदिवर्धन (तक्षक).

## तिसरा वंश.

३० *शिशुनाग ( सहस्रनाग ), ३१ काकवर्ण, ३२ क्षेमधर्म, ३३ क्षेत्रज्ञ, ३४ विंधिसार, ३५ अजातशत्रु, ३६ दर्भक, ३७ अजय, ३८ नंदिवर्धन, ३९ महानंद, ४० ‡ नंद, ४१ $ सुमाल्य.

## चवथा वंश.

दशरथ ४२ ॥ चंद्रगुप्त, ४३ वारिसार, ४४ अशोकवर्धन, ४५ सुयश, ४६ संगत, ४७ शालीशुक, ४८ ¶ सोमशर्मा, ४९ शतधन्वा, ५० † बृहद्रथ ( येथपर्यंत मौर्यराजे १० यांणीं १३७ वर्षें राज्य केलें ).

## पांचवा वंश.

५१ पुष्यमित्र, ५२ अग्निमित्र, ५३ सुज्येष्ठ, ५४ वसुमित्र, ५५

---

* याणें जैनधर्म स्थापिला व अबूवर जैनमंदिरें बांधिलीं. हा नागकुळाचा मूळपुरुष असून इ० स० पूर्वी ५५०—६०० यामध्यें जाहला. शिशुनागापासून १० राजांनीं ३६० वर्षें राज्य केलें. हा राजा तक्षक कुळापैकीं होय.

‡ हा शूद्रीपासून उत्पन्न झाला. याणें क्षत्रियांचा नाश केला. याजपासून पुढें झालेले राजे शूद्रप्राय अधार्मिक असे झाले. नंदानें परशुरामाप्रमाणें पराक्रम करून सार्वभौम राज्य केलें. यालाच महापद्मपति असें नांव आहे. याचा मुलगा सुमाल्य.

$ सुमाल्यप्रमुख ८ राजांनीं १०० वर्षें राज्य केलें. नांवें उपलब्ध नाहींत.

॥ चंद्रगुप्त हा, ख्रिस्तानंतर ३२० वर्षी मॅकडोन येथें राज्य करणारा जो अलेक्झांडर त्याशीं समकालीन होता.

¶ आमच्याकडे एक जुनें पुस्तक आहे. त्यांत, सोमशर्म्याला ६ पुत्र झाले, त्यांचीं नांवें—१ चव्हाण, २ मोरे, ३ पवार, ४ राष्ट्रकुंड, ५ धामपाल, ६ अनंग. यांचेपासून पुढें ९६ कुळें झालीं, असें लिहिलें आहे. श्री० हिंमतबहादर चव्हाण यांचे पुरोहित वे० शा० सं० पुरुषोत्तमशास्त्री भाळवणीकर यांचे लेखी जुने पुस्तकांतही असेंच लिहिलें आहे.

† बृहद्रथाला मागध देशांतून हांकून लाविलें व त्याचे वंशज धार व चितोड येथें राज्य करिते झाले. या वंशाचा संबध पुढें कुळविचारांत आला आहे.

भद्रक, ५६ पुलिंद, ५७ घोष, ५८ वज्रमित्र, ५९ भागवत, ६० *देवभूति ( शुंग ).

## सहावा वंश.

६१ भूमित्र, ६२ नारायण ( पारण ) ६३ ※ सुशर्मा.

## सातवा वंश.

६४ कृष्ण, ६५ श्रीशांतकर्ण, ६६ ¶ पार्णमास ( परमार ) ६७ लंबोदर, ६८ विकल, ६९ मेघस्वाति, ७० अटमान, ७१ अनिष्टकर्मा, ७२ हलेय, ७३ तलक, ७४ पुरीषभीरु ( पुरुषवर ), ७५ सुनंदन, ७६ चकोर, ७७ शिवस्वाती, ७८ गोमती, ७९ पुरिमान, ८० मेदशिरा, ८१ शिवस्कंद, ८२ यज्ञश्री, ८३ विजय, ८४ ‡ चंद्रविज्ञ ( चांद्रबीज ), ८५ § सलोमधी ( सालंघी ).

---

* शुंगवंशांतील १० राजांनीं ११२ वर्षें राज्य केलें. शुंग हा परस्त्रीक होता. पुढें त्याचा अमात्य कण्व वसुदेव नांवाचा होता. त्यानें शुंगाला ठार मारलें व आपण राज्य करूं लागला. या कण्वराजांनीं ३४५ वर्षें राज्य केलें.

※ सुशर्म्याला त्याचा भृत्य वृषल ( शूद्र ) बली नांवाचा होता. त्यानें ठार मारून आपण राज्य करूं लागला. पुढें त्याचा बंधु कृष्ण ह्मणून होता, तोच गादीवर बसला. या कृष्णापासून सलोमधीपर्यंत ३० शूद्र राजांनीं ४५६ वर्षें राज्य केलें; परंतु ग्रंथांत २२ राजे नमूद आहेत.

¶ यालाच पवार असें ह्मणतात, असें इंग्रजी इतिहासावरून कळतें.

‡ या राजापासून पुढें अभीरादि राजे ७, गर्दभी राजे १०, कंकराजे १६, यवनराजे ८, पुष्कस राजे १४, गुरुंडराजे १०, मिळून ६५ राजांनीं १०९९ वर्षें राज्य केलें. पुढें मौन राजे ११ यांनीं ३०० वर्षें राज्य केलें. पुढें भूतनंदादिक राजे ५ यांनीं १०६ वर्षें राज्य केलें. याचीं एकंदर वर्षें ४१५३ झालीं. येथपर्यंत माहिती लागते.

§ वर लिहिलेले राजे यांचीं नांवें मात्र भागवतांत दिलीं नाहींत; परंतु ही सर्व हकीगत भागवतांत दिली आहे. अभीरवंशाचा संबंध इतिहासांत लागतो. हा, मेवाडच्या राण्याचा पूर्वज बापारावळ याशीं समकालीन होता. बापारावळ हा श्री दाशरथी रामापासून ८० वा पुरुष. याला इ० सन ७१४ त मोरे वंशांनीं धरलें; परंतु ७२० त मोरे वंशापासून चितोड शहर याणें परत घेतलें. पुरु-

कुरूचा तिसरा मुलगा जन्हु, याचा वंश—१ जन्हु, २ सुरथ, ३ विदूरथ, ४ सार्वभौम, ५ जयसेन, ६ राधिक, ७ अयुतायु, ८ क्रोधन, ९ देवातिथि, १० ऋष्य, ( ऋक्ष ), ११ दिलीप (भीम), १२ प्रतीप. ( याला *देवापि व शंतनु असे दोन मुलगे होते. पैकीं देवापि याचा वंश नाहीं.) शंतनु याचा वंश—१ शंतनु, २ विचित्रवीर्य. विचित्रवीर्याला, धृतराष्ट्र व पंडु असे दोन मुलगे होते. पैकीं धृतराष्ट्राला दुर्योधनादि १०० मुलगे होते. पंडूचा वंश—१ पंडू, २ अर्जुन, ३ अभिमन्यु,

## पहिला वंश.

४ परिक्षित, ५ जनमेजय, ६ शतानीक ( अश्मंद ), ७ सहस्रानीक ( अभुन ), ८ अश्मंद ( महाजन ), ९ असीमकृष्ण ( जेश्रित ), १० निमिचक्र ( धृतवान ), ११ चित्ररथ ( उग्रसेन ), १२ कवि ( शूरसेन ), १३ वृष्टिमान् ( सुतश्याम ), १४ सुषेण ( ऋष्मराज ), १५ सुनीथ ( वखिल ), १६ नृचक्षु, ( सुतपाल ), १७ सुखीनल ( नरहरदेव ), १८ पारिप्लव ( जेश्रित ), १९ सुनय ( मेधावी ), २० ( भूपात ), २१ ( शिववंश ), २२ नृपंजय ( श्रावण ), २३ दुर्दाह ( कीकण ), २४ तिमि ( पधारत ), २५ बृहद्रथ ( दस्युनम ), २६ सुदास ( अध्धुलिक ), २७ शतानीक ( हंतवर्ण ),

---

वंशापैकीं सुदेष्ण राजापासून जरासंधाचा वंश सालंघी याजपर्यंत भागवत, इतिहास यांच्या आधारानें लिहिला आहे; परंतु हा वंश सरळ नाहीं. ह्मणजे मध्येंच दुसरे राजे राज्य करिते झाले.

* देवापी हा कलियुगांत चंद्रवंश नष्ट झाला असतां, पुन: कृतयुगांत तो उत्पन्न करणेंकरितां, कलापग्रामांत राहिला आहे. याचप्रमाणें सूर्यवंशांतील मरु राजा हा पुन: कृतयुगांत सूर्यवंश उत्पन्न करणेंकरितां, कलापग्रामांत राहिला आहे, असें श्रीमद्भागवत नवमस्कंधीं लिहिलें आहे.

२८ दुर्दमन ( धुंडपाल ), २९ बहीनर ( धुंसळ ), ३० दंडपाणि *( सेनपाल ),

## दुसरा वंश.

३१ निमि, ३२ $क्षेमक ( खेवनराज ), ३३ विश्रवा, ३४ सुरेंद्र, ३५ सरिशाहा, ३६ आहंगसाळ, ३७ वीरजित, ३८ दुर्वेर, ३९ सोदपाल, ४० शूरसूनु, ४१ सिंगराज, ४२ उमरगोदा, ४३ उमरपाल, ४४ सर्वेहा, ४५ ¶पधारत,

## तिसरा वंश.

४६ मुदपाल, ४७ महाराज, ४८ श्रीसेन, ४९ महीपाल, ५० महीबली, ५१ श्रूपवर्ती, ५२ नेत्रसेन, ५३ सुमुखदन, ५४ जेठमल्ल, ५५ कलंक, ५६ कलमन, ५७ शिरमर्दन, ५८ जयनंग, ५९ हरगुंज, ६० † हीरसेन,

## चवथा वंश.

६१ अंतिनाई, ६२ दूधसेन, ६३ सिंधवज, ६४ महागंग, ६५ नद, ६६ जीवन, ६७ उदय, ६८ जहल, ६९ आनंद, ७० राजपाल. ( येथपर्यंत हा वंश इतिहासांत सांपडतो. हा राजा सूर्यवंशांतील सुमित्र यांशीं समकालीन होता ).

---

* सेनपाल यास याच्या प्रधानानें ठार मारून गादी बळकाविली. पांडवांचा वंश येथें संपला.

$ या राजापासून पुढें भागवतीं वंश दिला नाहीं. स्कंध ९ अ० २२ श्लोक ४४. येथून पुढील राज इतिहासावरून लिहिले आहेत.

¶ यास त्याच्या रजपूत प्रधानानें ठार मारलें व आपण राज्यावर बसला. या १४ राजांनीं ५०० वर्षे राज्य केलें.

† हीरसेन याचें राज्य त्याच्या सेनापतीकडे गेलें.

अजमीढाचा चवथा मुलगा बृहदिषु याचा वंशः—१ बृहदिषु, २ बृहद्धनु, ३ बृहत्काय, ४ जयद्रथ, ५ विशद, ६ सेनजित, ७ रुचिराश्व, ८ पार, ९ पृथुसेन, १० बालराज, ११ अनूह, १२ विष्वक्सेन, १३ उदक्सेन, १४ भल्लाद, १५ *दुर्बोध. ( याचा वंश उपलब्ध नाहीं ).

## ३६ कुलें व वंशाची सविस्तर माहिती.

रजपूत लोकांचे मुख्य वंश ह्मणजे जातकुळी ज्या आडनांवांवरून चालतात, तीं आडनांवें पुढें लिहिल्याप्रमाणें:— १ इक्ष्वाकु ( सूर्यवंश ), २ इंदु ( सोम अथवा चंद्रवंश ), ३ ग्रहलोट अथवा गेहलोट, ४ यदुवंश, ५ तुवर, ६ राठोड, ७ कुशवाह अथवा कच्छवाह, ८$ परमार, ९ चहुमण अथवा चव्हाण, १० चालुक्य अथवा साळुंखे, ११ परिहर, १२ चावरे ( डा ), १३ टाक अथवा तक्षक, १४ जीत, १५ हूण, १६ काठी, १७ बाल, १८ झाला, १९ कामेरी, २० गोहिल, २१ सारविया, २२ शेलारे, २३ दाबी, २४ गोहर, २५ दोडा, २६ गेहरवळ, २७ वीरगुजर, २८ सेंगार, २९ सिकरवळ, ३० बैस, ३१ दाहिया, ३२ जोहिया, ३३ मोहिल, ३४ निकुंपा, ३५ राजपाली, ३६ दाहिमा.

यांशिवाय १ हूल २ दाहिरिया असे दोन वंश निराळे आहेत.

वर निदर्शित केलेल्या शाखांमध्येंही आणखी उपशाखा आहेत. वर दाखविलेल्या प्रत्येक शाखेस वंश, गोत्र व कुलगुरु आहेत; परंतु त्यांच्या गोत्र आचार्य वगैरेसंबंधीं आपण त्यांपाशीं माहिती मिळवूं गेल्यास, ती आमच्या उपाध्यायापासून मिळेल असें ते सांगतात; ह्यावरून त्या लोकांत स्वजात्यज्ञान किती आहे तें सहज समजतें; तथापि त्यांच्या

* याला १०० मुलगे झाले, ते भिल्ल झाले.

$ चांदभाट असें लिहितात कीं, अग्निकुलचतुष्टयाशिवाय सर्व योनिज होत.

लग्नकार्याचे वेळीं गोत्राची वगैरे चौकशी फार बारकाईनें करणेची चाल आहे.

गेहलोट हा सूर्यवंशमालिकेंतील वंश होय, व तद्वंशस्थ राजपुरुष राणा या किताबानें प्रसिद्ध आहेत. ह्यांचें राज्यसूत्रस्थान चितोड हें होतें. ज्या गेहलोट वंशाचे पूर्वज रविकुलदीप श्रीरामचंद्र हे होत, असें सर्वत्र मान्य आहे, त्याच वंशांत पूर्वी कोणी कनकसेन राजा होऊन गेला. त्यानें कोसल नामें स्वदेश सोडून काठेवाडांत सूर्यवंशजाचें राज्य स्थापन केलें. या राजाचे कुलांतील, कोणा विजयनामें राजानें काठेवाडांत विजापूर नांवाचें शहर वसविलें. येथें पूर्वी पांडवांचा ( त्यांच्या अज्ञातवास-कालीं ) आश्रयदाता भारतप्रसिद्ध विराट राजा राहत असे. ह्या-वरून, या विजापुरास विराटनगरी ह्मणण्याचा प्रघात कां पडला असावा, हें आमच्या वाचकांच्या ध्यानीं येण्यासारखें आहे.

या गेहलोट वंशजांनीं पुढें वल्लभीपुर आपली राजधानी केली, व वल्लभी नांवाचा एक नवीन शक सुरू केला. सौराष्ट्रांत या वल्लभी वंशाचें राज्य सुमारें ५।६शें वर्षें पावेतों अव्याहत चाललें होतें, अशासंबंधीं माहिती इतिहास व ताम्रपट यांजवरून कळण्यासारखी आहे. वल्लभीशक विक्रमसंवत् ३७५ किंवा इ० स० ३१९ यावर्षी चालू असावा असें टॉलमी साहेबाचें ह्मणणें आहे. या वल्लभीवंशांतील-लच शेवटचा राजा प्रसिद्ध शिलादित्य इ० स० च्या ६ व्या शतकांत गजनी येथें राज्य करीत असतां, इराणी लोकांनीं त्यास ठार करून, त्याच्या वंशजांस पार हांकून लाविलें. शिलादित्याची अशी वाट झाली, त्यावेळीं त्याची पतिविरहाकुल सुशील स्त्री गरोदर होती, व स्वपतिप्रतिबिंबदर्शन ( पुत्रोत्पत्ति ) केव्हां होईल या चिंतेनें अगदीं क्षीण झाली होती. शेवटीं ईशकृपेनें तीस पुत्रसंतान झालें, व येणें-करून तिचा चिंतित मनोरथ पूर्ण झाला. ह्या मुलाचें नांव ग्रहादित्य असें ठेविलें, व पुढें वयांत आल्यावर त्यानें, ईडर नांवाचें लहानसें राज्य हस्तगत केलें. ह्या ग्रहादित्यास ग्रहलोट ह्मणण्याचा प्रघात पडला होता, व पुढें कालेंकरून त्याच नांवाचा अपभ्रंश होऊन, गेहलोट

[stamp]

नांव पुनः त्यास प्राप्त झालें, व येणेंकरून गेहलोटवंशाचें पुनरुज्जीवन झालें.

पुढें हे गेहलोटवंशज ईडरराज्यापासून पदच्युत होताच, त्यांनीं लागलीच आहर येथें आपला राजध्वज उभारिला. या आहर शहरास आनंदपूर आहर असेंही नांव असून, तें हल्लीं उदेपुराजवळ आहे.

आहर हें त्यांनीं स्ववास्तव्यस्थान केलेवर, आपलें पूर्ववंशनांव जें गेहलोट तें रद्द करून, आहार्य हें नवें नांव आपल्यास लाविलें. आहार्य हें टोपण नांव इ० स० च्या १२ व्या शतकापर्यंत सारखें चाललें होतें; पण या शतकांत या गेहलोट वंशांतील कोणी राहूप नामें ज्येष्ठ पुत्र होऊन गेला. त्यानें चितोड राजधानीवरील हक्कावर पाणी सोडून, तरवारीच्या जोरानें परमारराजापासून कांहीं मुलुख बळकाविला आणि डोंगरपूर हें राजधानीचें शहर केलें. ह्या राजधानीचा उपभोग त्याचा कनिष्ठ पुत्र महूप यानें सिसोदा शहरीं आपली राजधानी स्थापीपर्यंत घेतला, व आहार्य हें नांव सिसोदा येथें राज्यस्थापना होईपर्यंत चाललें होतें. आतां सिसोदा येथें तक्त आल्यावर आहार्य नांवाचा लोप होऊन, यांचे वंशजांस सिसोदिया हें नांव पडलें. येणेंप्रमाणें गेहलोट व आहार्य या नांवांचा अस्त होऊन, सिसोदिया हें नांव या वंशास लागलें.

सध्यां ह्या नांवाचा वंश सर्वप्रसिद्ध आहे; परंतु हा गेहलोट वंशाचा पोटभेद असल्यानें, त्या कुलांतील पुरुषांस गेहलोटवंशीय ह्मणतात.

गेहलोट कुळाचे २४ पोटभेद आहेत; ते खालीं दाखविल्याप्रमाणें:— १ आहार्य, २ मांगुलिया, ३ §सिसोदिया, ४ पिपरा, ५ कालम, ६ गाहोर, ७ धोरनिया, ८ गोहेद, ९ मग्राशह, १० भीमला,

§ मराठी राज्याचा स्थापक, शिवाजी, सिसोदिया वंशांतील होता, अशासंबंधीं पुष्कळ माहितीचे लेख मिळतात; परंतु त्यांचे पूर्वज जातीनें रजपूत असून, त्यांनीं दक्षिणेंतील कुळंब्याशीं आहार व्यवहार ठेविल्यानें, त्या वंशजांस मराठे ह्मणूं लागले. अशी इतिहासावरून माहिती मिळते.

११ कामकौतुक, १२ कोटेश, १३ सुराह, १४ उहर, १५ बो-सिबा, १६ निरूप, १७ नाडोरिया, १८ नाधोत, १९ ओजाकर, २० कूटचर, २१ दोसद, २२ बाटेवाड, २३ पाह, २४ पुरोट.

## २ यदुवंश.

यदु हा चंद्रवंशांत महापराक्रमी राजा होऊन गेला. या प्रसिद्ध पुरुषाचा कोणा एका इंदुवंशीय बुद्धनामें राजाच्या पिढीकडे संबंध लागतो. या राजाच्या कुलांत सर्वमान्य बलदेव राजा झाला. त्याणें व त्याचे वंशजांनीं द्वारका येथें राज्य केलें. त्यांच्या वंशजाची शेवटची राजधानी द्वारका हें तटबंदीचें शहर होतें; तेथें प्रतिहत झाले-कारणानें त्यांनीं मुलतानच्या द्वारानें सिंधुनदापलीकडे आपला मार्ग सुधारिला. याउपर त्यांचा कांहीं विश्वसनीय इतिहास उपलब्ध नाहीं. लोकांत दंतकथांची मात्र समृद्धि आहे; परंतु कृष्णाचे वंशजांनीं सिंधुनदी उतरून पंजाबाकडे आपला मोर्चा फिरविला, व आपल्या बाहुबलानें काबूल देश हस्तगत करून घेतला. हा देश आपल्या मुठींत येतांच, त्यांनीं गजनी नांवाचें शहर वसवून, तेथें आपली राजधानी केली, आणि थेट समरकंदपर्यंत आपली वसाहत करून, आपला अंमल बसविला.

कांहीं कालानें या कृष्णवंशास यवनांनीं अनेक प्रकारांनीं त्रास देऊन, परत पंजाबांत हांकून लाविलें, व तेथूनही मागें हटत हटत त्यांची मजल सतलज नदीच्या अलीकडे हिंदुस्थानच्या अरण्यांत येऊन ठेपली.

ते परत आल्यावर कांहीं काळपर्यंत पंजाबांत असतां त्यांनीं तेथें सळभणपूर हें शहर स्थापिलें. पुढें हिंदुस्थानांतील अरण्यांत आल्यावर, तेथील लंग्ह, जोह, मोहील वगैरे लोकांस पिटाळून देऊन, विक्रम संवत् १२१२ ह्मणजे इ० स० ११५७ त या वंशजांनीं ताणोता, धरवळ आणि जेसलमीर ह्या नांवांचीं शहरें वसविलीं व जेसलमीर हें राजधानीचें शहर केलें. या कृष्णवंशजांनीं गेहलोट वंशीयांप्रमाणेंच

पूर्वनांव टाकून आपल्यास भाटीवंशज ह्मणवूं लागले. हल्लीं यादव ह्मणून जे आहेत, ते यदुवंशजच होत. या वंशाच्या आठ शाखा खालीं सादर केल्या आहेत.

१ यदु, २ भाटी, ३ जाडेजा, ४ समैच्छ. या चार शाखा क्रमानें किरोली, जेसलमीर, कच्छभूज व सिंधप्रांत येथें आहेत.

५ मदैच्छ, ६ बिडमन, ७ बुद्ध, ८ सोह. या चार शाखांची माहिती उपलब्ध नाहीं.

## ३ जाडेजाकुल.

भाटीकुलाप्रमाणेंच ही शाखा यदुवंशांतील होय व या कुलांतील राजे हल्लीं कच्छभूज येथें राज्य करितात. आतां त्या कुलांतील लोक अशी माहिती देतात कीं, आमचे पूर्वज तुर्कस्थानापैकीं शाम ह्मणजे सीरिया प्रांतांत मूळचे राहणारे. तेथून कारणपरत्वें इकडे येऊन त्यांनीं आपलें राज्य स्थापिलें व ते इराणच्या जमशेदशहाशीं आपला बादरायण संबंधही जोडतात. आणखी ते शाम शहरचे मूळ नागरिक असून इकडे आल्यावर, शाम शद्बाचा जाम असा अपभ्रंश झाला आहे असेंही ते सांगतात.

कच्छचे महाराजांस जामसाहेब ह्मणण्याची चाल पडली आहे व कच्छप्रांतीं जामनगर प्रसिद्ध आहे, तें ह्याच राजकुलानें वसविलें.

पाहूं गेलें असतां जाम शब्दाची उत्पत्ति ह्या माहितीहून अगदीं भिन्न आहे. द्वारकाधीश कृष्णजींस त्यांच्या कृष्णवर्णावरून शाम हें विशेषण प्राप्त झालें. पुढें जाडेजावंशीय आपल्यास शामपुत्र ह्मणवूं लागले. ह्यानंतर शाम याचा जाम हा अपभ्रंश झाला. या वंशांतील कित्येक आह्मीं जांबवंतीवंशज आहों, ह्मणून आह्मांस जामवंशीय ह्मणण्याचा परिपाठ आहे असेंही सांगतात.

चंबळा नदीचे कांठीं वसलेले केरेली शहरीं राज्य करणारे राजे याच कुलांतील होत.

आपल्या महाराष्ट्रांत जाधव आडनांवांचीं घराणीं फार आढळतात; त्याचे मूळ वंशज जाडेजा हेच होत. ह्याच्या ३ शाखा आहेत. १ जाडेजा, २ जाधव, ३ जाम.

## ४ तुवरवंश.

तुवर ही शाखा यदुवंशापैकीं आहे; तथापि वंशशोधक तीस मुख्य शाखेंतच गणतात. ह्यांचा पांडववंशाकडे संबंध आहे व याप्रमाणें ते आपणांस पांडववंशज ह्मणवितात. ह्या वंशांत प्रसिद्ध शककर्ता राजा विक्रमादित्य झाला. त्यानें उज्जनी येथें राज्य केलें, हें आबालवृद्धांसही माहीत आहे. ह्या राजानें इंद्रप्रस्था ( दिल्ली ) हून तक्त हलवून अवंती येथें राज्यस्थापना केली. तेव्हांपासून इंद्रप्रस्थ ८०० आठशें वर्षें अगदीं ओसाड पडलें होतें. याचें पुनरुज्जीवन वि० सं० ८४८ ह्मणजे इ० सन ७९२ त अनंगपाल तुवर राजानें केलें.

अनंगपालानंतर २० राजे झाले. त्यांतील शेवटचा राजा अनंगपाल झाला. त्यास संतानाची आशा नष्ट झाल्यामुळें, त्यानें तत्कालीन रजपूतांच्या वहिवाटीप्रमाणें आपला दौहित्र ( मुलीचा मुलगा ) पृथ्वीराज चव्हाण यास, वि० सं० १२२० ह्मणजे इ० सन ११६४ या वर्षीं दिल्लीचा राज्याधिकारी केला.

ज्या तुवर वंशांत विक्रमादित्यासारखे पराक्रमी, उदार, कीर्तिमान् व यशस्वी राजे झाले, अशा दैदीप्यमान् वंशाचा ऱ्हास व्हावाना!

ह्या वंशाकडे २२५० वर्षें राज्य अव्याहत चाललें. अशा राज्यकर्त्या दीर्घायु वंशासारखा दुसरा वंश या पृथ्वीवरील कोणत्याही इतिहासांत मिळणें दुरापास्त आहे. या दक्षिणेंत शिरके, फाळके वगैरे मराठे आपल्यास तद्वंशीय ह्मणवितात अशी माहिती मिळते. अलीकडे तुवर वंशाचा शोध लागत नाहीं.

## ५ राठोडा वंश.

या वंशाची मूळ उत्पत्ति मोठी डळमळीत आहे. हा वंश आपला मूळपुरुष श्रीरामचंद्रपुत्र कुश हा होय असें मानितो; अर्थात् तो आपल्यास

सूर्यवंशीय ह्मणवितो; परंतु भाट लोकांच्या कवनांत या वंशाची मूळपीठिका हिरण्यकश्यपूच्या कन्येकडे लाविलेली आढळते; ह्मणजे भाट या वंशीयास काश्यपवंशीय ह्मणतात. इ० स० चे ९ वे शतकांत राठोडवंशीय एक राजा कनोज येथें राज्य करीत असतां, त्यास यवनांनीं पदच्युत केलें. कनोज येथें राज्य करणेचे पूर्वी त्यांनीं अयोध्येस राज्य केल्याची इतिहासांत माहिती आहे.

राठोडवंशीयांनीं दिल्ली येथील शेवटल्या तुवर व चव्हाण राजांशीं, त्याचप्रमाणें अन्हिलपूरकराशीं रण माजवून यश संपादल्याचीं वर्णनें फार ठिकाणीं आढळतात. आपआपसांतील तंटे बखेडे व इकडे राठोड राजांशीं स्ववर्चस्वस्थापनार्थ जाहलेले युद्धप्रसंग, ह्यायोगें त्या हीनदैवी शूर चव्हाण कुलाचा वंशक्षय झाला, व अशीच इतर राजकुलांची वाट लागली. अर्थात् वायव्यप्रांत हतवीर्य झाला. पुढें यवनादि लोकांनीं त्याची पायमल्ली करून, त्यास निर्धूत करून सोडिलें. इकडे त्यांनीं पुढें रेटीत रेटीत आपला अंमल कनोजपर्यंत बसविला. ते तेथें येतांच रणभीरु राजा जयचंद राठोड यानें पळ काढिला, आणि मार्गामध्यें त्याची जलसमाधि भागीरथींत झाली. त्याचा मुलगा शिवाजी, यानें मारवाडाकडे वाट धरली, व ह्या प्रदेशीं कांहीं मुलुख त्यानें बळकाविला. मडोरचे परिहारवंशीय राजांचा वंश नाहींसा झालेकारणानें, तेथीलही राज्यपद ह्यासच मिळालें. पुढें या शिवाजीच्या वंशांनीं आपल्या नैसर्गिक शौर्य, पराक्रमादि गुणांचें पुनरुज्जीवन करून, मारवाडांत विजयध्वज उभारिला. त्यांनीं स्वपूर्वजहितशत्रु जे मोंगल यांसही कुमक दिली.

मोंगल लोकांस मिळालेल्या यशप्राप्तीचा अर्धा भाग राठोड वंशाच्या साहाय्यानें प्राप्त झाला, असें मुसलमान इतिहासकारांनीं लिहिलें आहे. इकडील घाटगे आडनांवाचे लोक आपण मूळ राठोडेच असें सांगतात. या कुळाचें गोत्र गौतम, आचार्य शुक्राचार्य, कुलदैवत पंखाणी देवी व शाखा मार्दवंदनी. राठोड कुळाच्या २४ शाखा आहेत, त्या येणेंप्रमाणें:— १ खोकरा, २ धांदल, ३ बटेल, ४ चकीत, ५ दुहुं-

रिया, ६ रामदेव, ७ मलावत, ८ घोगदेव, ९ जयसिंगा, १० काब्रिया, ११ जोबासिया, १२ जोरा, १३ सुंद, १४ कठेचा, १५ महोली, १६ महेच्छ, १७ मूरासिया, १८ काजीर, १९ हटुंडिया, २० बदुरा वगैरे.

## ६ कच्छवाह किंवा कुशवाह वंश.

ह्या वंशाचा मूळपुरुष श्रीरामचंद्राचा पुत्र कुश असलेमुळें, यास कुशवाह असें नांव पडलें. या कुशवाह शब्दाचा अपभ्रंश कच्छवाह हाच प्रसिद्ध झाला. ह्या वंशानें कोसलदेश सोडून दुसरीकडे आपलें वास्तव्य स्थान केलें, व तेथें नरवार नांवाचा किल्ला बांधिला. या किल्याचें स्वामित्व सुप्रसिद्ध नल राजाकडे कांहीं कालपर्यंत होतें. पुढें तो किल्ला असलेला प्रदेश यवनांनीं बळकाविला; परंतु थोड्याच कालांत मराठ्यांनीं तो देश यवनांचे हांतून काढून घेतला. हल्लीं हें नलवास्तव्यस्थान शिंदेसरकारचे ताब्यांत आहे.

इ० स० च्या १० व्या शतकांत या कुशवाह वंशांतील एका पुरुषानें अभर येथें आपलें राज्य स्थापिलें, आणि तेथील मेण लोकांस हांकून लाविलें. या वंशांतील राजे, दिल्लीचा अधिपति चव्हाण राजा, याचे मांडलीक होते. पुढें तैमूरलंगानें दिल्ली शहर हस्तगत करून मोंगलाचें राज्य स्थापिलें. या काळापासून या वंशास उतरती कळा लागली. ह्याच वंशजांनीं जयपूर शहर वसविलें. या वंशाच्या १२ शाखा झाल्या आहेत; त्या कोठें उपलब्ध नाहींत.

## ७ अग्निकुळें.

परमार, परिहार, साळुंखे आणि चव्हाण या कुलचतुष्टयास अग्निकुळें अशी संज्ञा आहे. हीं कुळें इ० स० पूर्वी २०० वर्षें हिंदुस्थानांत आलीं. येथें त्यांनीं आपलें वसतिस्थान करितांच, ब्राह्मणांनीं बुद्धधर्मउच्चाटनार्थ त्यांस क्षात्रधर्मदीक्षा दिली. एतत्संबंधीं इतिहास पाली भाषेंतील ग्रंथांत उपलब्ध असोन, बौद्धधर्मी देशांतील जनांसही थोडीबहुत माहिती आहे. कोणी बुद्धधर्माचा पार्श्वनाथ नांवाचा सत्पुरुष क्षत्रिय

असून, तक्षक-कुल-जात असल्यानें, व तक्षककुल अग्निशाखीय असल्यानें, अशा पुण्यपुरुषाचें सर्प हें लांच्छन धारण करण्यांत हे मोठा अभिमान बाळगितात. सूर्यवंश वैदिकधर्म संरक्षणार्थ असमर्थ झाला, त्याकाळीं अग्निवंश ईशेच्छेनें पुरातन श्रुतिधर्मस्थापनार्थ अस्तित्वांत आला असें त्या लोकांचें ह्मणणें आहे. असें असतांही ह्या कुलांत बरेच राजे बुद्धानुयायी झाले.

आरंभीं उल्लेख केलेल्या शाखांत, परमार ही शाखा श्रेष्ठ व कीर्तिमान् व प्रसिद्ध आहे. या कुळांतील राजांनीं महेश्वर, धार, मंडु, उज्जयनी, चितोड, गिरिराज, अबू, चंद्रवती, महू, परमावती, उमरकोट, भेकर, आणि पट्टण ह्या मुख्य ठिकाणीं राज्यें केलीं

अन्हिलपूर येथील द्रव्यवान् व धुरंधर राजास ह्या परमार वंशजांनीं द्रव्य व पौरुष इत्यादि गुणांत मागें टाकून, राज्यविस्तारांतही त्यांचा तोरा आपणापुढें चालूं दिला नाहीं असें ताम्रपट व शिलालेख यांवरून ठरतें. या वंशांत एकंदर ३।४ भोजराजे झाले. मुंजपुत्र भोज याविषयीं तर संशयच नाहीं. बाकी राहिलेल्या ३ भोजराजांपैकीं कालिदासादि पंडित नव रत्नांचा भोक्ता भोजराजा कोणता याविषयीं इतिहासांत मतैक्याभाव आहे. आतां येथपर्यंत कथन केलेल्या क्षत्रियकुलराजांची अधिकारसीमा नर्मदेच्या उत्तरेपर्यंतच होती; परंतु चंद्भाटाचे लेखांत, या परमार कुलांतील रामपरमार नांवाच्या कोणी चक्रवर्ती राजानें, कर्नाटकांत राज्य केल्याचा उल्लेख आहे. चंद्रगुप्त व शालिवाहनासारखे मोठमोठे राजे या कुलांत झाले. आयुगिरीच्या पायथ्याशीं असलेल्या चंद्रवती नगरीस, ह्या परमार वंशजांनींच राज्य केलें अशाबद्दलचे लेख आहेत. ह्या परमार वंशाच्या ३९ शाखा असून, उदेपूरच्या मानकऱ्यांत ह्यांची योग्यता फार आहे. हल्लीं यांतील उपलब्ध असलेल्या शाखा येणेंप्रमाणें :—

१ सोदा—हिंदुस्थानांतील अरण्यापैकीं धोत येथील मांडलीक राजे.

२ साकळ—पुगळ व मेवाडांतील कांहीं भागाचे राजे.

३ खैर—खेराळू ह्मणून गायकवाड सरकारचे अमलाखालीं एक गांव आहे, तेथील राजे. हल्लीं त्याचें तेथें कांहीं नाहीं.

४ विहील—चंद्रवतीचे राजे.

५ मैपावत—हल्लीं मेवाडांतील विजाली संस्थानचें राज्य त्याचेच वंशज करितात.

६ बुल्हेर—उत्तरेकडील अरण्यांत.

७ कावे—पूर्वी सौराष्ट्रांत ( काठेवाडांत ), पुढें शिरोवीत.

८ उमठा—उमठवाडाच्या राजांनीं मेवाडांत १२ पिढ्या राज्य केलें. नंतर परमारांनीं तेथें येऊन राज्योपभोग घेतला; परंतु १८१७ त ब्रिटिश सरकाराशीं युद्धप्रसंग झाले-पासून, यांस आपलें पराधीनत्व कबूल करणें भाग पडलें.

९ मोरे ( री )—प्रसिद्ध राजा चंद्रगुप्त व चितोडचे राणे याच शाखेंतील होत.

१० उमरा व ११ सुमरा—ह्या शाखा प्रथम अरण्यांत निघून गेल्या व हल्लीं या शाखेचे लोक मुसलमानधर्मी आहेत.

१२ रेहर, १३ धुंडा, १४ सोरटिया व १५ हरेर हे माळव्यांत.

१६ खोंडा, १७ खेजर, १८ सुगर, १९ बरकोटा, २० पुतीनी, २१ सामपाळ, २२ भीवा, २३ कालपूसर, २४ कुलमोह, २५ कोहिल, २६ पूप, २७ कहोरिया, २८ दंड, २९ डिवा, ३० बरहर, ३१ जिपरा, ३२ पोसर, ३३ धुंटा, ३४ रीकमव, ३५ टिका, ह्या १६व्या ह्मणजे खोंडापासून बाकीच्या शाखांचा कोठें शोध लागत नाहीं.

## ८ चव्हाण वंश.

ह्या कुळास चहुमण असेंही दुसरें नांव आहे. हे सर्व अग्निकुळा-मध्यें प्रसिद्ध असून, याच्या हांतून मोठमोठीं पराक्रमाचीं कृत्यें घडलीं आहेत. याच्या २४ उपशाखा आहेत व यांचीं वर्णनें भाट कवींनीं अनुक्रमानें केलीं आहेत. बुद्ध धर्माचा चोहोंकडे प्रसार झाला त्या काळीं हिंदुधर्माभिमानी राजेरजवाड्यांनीं, ह्या नूतन मताचा लोप करावा

या हेतूनें फार प्रयत्न केले; तथापि त्यांस यावें तसें यश आलें नाहीं. शेवटीं हें काम चव्हाण वंशीयानीं हातीं घेऊन यश मिळविलें. ह्या कुळाच्या उत्पत्तीविषयीं निरनिराळ्या कथा आहेत. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, चव्हाण हा वंश चतुर्भुज अथवा चतुर्बाहुपासून झाला आहे.

या भरतभूमीमध्यें नास्तिक मतप्रसार झाला, त्या कालीं, त्याच्या उच्चाटनार्थ मुनींनीं अर्बुदगिरीवर यज्ञास आरंभ केला. यज्ञसांगतेच्या वेळीं यज्ञकुंडांतून चार पुरुष निघाले. त्यांतील एक पुरुष ह्या कुलाचा मूलोत्पादक होय. दुसरा असाही लेख आढळतो कीं, वैदिकधर्माचा समूळ नाश करून नास्तिकांनीं चोहोंकडे उच्छाद मांडिला, त्याकालीं वसिष्ठादि मुनिश्रेष्ठांनीं गिरीराजावर यज्ञ सुरू केला. यज्ञाच्या पूर्णाहुतीचे वेळीं अग्निकुंडांतून एक चतुरंग पुरुष निघाला. त्याच्या अंगांत कवच, एका हातीं धनुष्यबाण, दुसऱ्या हातांत अग्नियष्टि ( जळकें लांकूड ) हीं होतीं. याचा चेहरा भयंकर, डोळे लाल गुंजेसारखे, छाती भरलेली, केश भृंगवत्.

हा पुरुष, या वंशाचा मूळपुरुष होय. ह्या वंशांतील ३९ पुरुषांनीं अन्हिलपुरास राज्य केलें; यांतील पहिला अन्हिलनामें राजा असून, शेवटचा प्रसिद्ध पृथ्वीराज होय. या वंशांतील पुरुषांनीं मोठमोठीं इतिहास प्रसिद्ध कृत्यें केलीं.

चव्हाण वंशांत होऊन गेलेल्या पहिल्या अजिपाल राजानें, अजमीर हें तटबंदीचें शहर बांधलें. ह्या अजीपालानें सांबरप्रांतीं राज्य केलें, त्यावरून यांस सांबरेराव असेंही नांव पडलें होतें, तेथेंच माणिकराय नांवें या वंशांतील एक राजा झाला. यानें, मुसलमानांनीं पहिल्यानें हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या, त्यावेळीं त्यांस, मागें हटवलें; परंतु महंमद गिझनीनें अजमीरावर चाल केली, त्यावेळीं तेथून पळ काढून तो सौराष्ट्रांत ( काठेवाडांत ) येऊन राहिला. या माणिकरायावर पहिलीस्वारी कासीमाचा सेनापति वालिद याणें केली होती. यानंतर पुढें इ० स० च्या ७ व्या शतकांत मुसलमानांनीं दुसऱ्यानें हिंदुस्थाना-

कडे दृष्टि फिरविली. तिसऱ्यावेळीं मुसलमानांनीं इ० स० १०९६ पासून स्वाऱ्या सुरू केल्या; तेवेळीं अजमीर येथें विसलदेव राज्य करीत होता. यवनांचा फडशा उडविण्यासाठीं प्रसिद्ध उदयादित्य, परमार आदिकरून राजांनीं, आपापलीं सैन्यें घेऊन एकजुटीनें मुसलमानांवर चाल केली; आणि यश मिळविलें. ह्या युद्धप्रसंगाची हकीकत जुन्या दिल्लींतील एका लोहस्तंभावर लिहिली आहे. हल्लीं बुंदी व कोट येथें राज्य करणारे राजे, वर सांगितलेल्या २४ शाखांपैकीं होत. ह्यांनीं वेळोवेळीं आपली मर्दुमकी गाजविल्यानें, चव्हाण वंशाच्या नांवाची जागृति अजूनही लोकांमध्यें ठेविली आहे. शहाजहान राजाचे मुलांनीं बंडें करून आपल्या वृद्ध पित्यास असह्य त्रास दिला. त्यावेळीं त्या बादशहानें, बुंदी-कोटच्या राजाशीं सख्य करून त्याचेपासून मदत मिळविली. अशाप्रसंगीं आपल्या हितशत्रूस मदत केल्यानें त्यांचे नांव अधिकच प्रसिद्ध झालें.

पुढें मुसलमानांचा अतिशय त्रास झाला, त्यावेळीं स्वराज्यरक्षणार्थ ह्या कुळांतील कित्येक राजे मुसलमान बनले; त्यांतील मुख्य, राघवगडचे खिची, शिरोहीचे देवरे, झालोरचे सोनगडा, साचोरचे चव्हाण, पावागडचे पवैच्छ हे होत. रजपूतकुलांत स्वधर्मत्याग करूनही स्वभूमि व अधिकार राखावा, असा हा नियम पृथ्वीराजाचा पुतण्या ईश्वरदास, ह्यानें अमलांत आणिला. या कुळाच्या २४ शाखा खालीं दिल्या आहेत, त्याः—

१ चव्हाण, २ हिरा, ३ खीची, ४ सोनीगरा, ५ देवरा, ६ पाविया, ७ संचोरा, ८ गोहेलवाल, ९ भटोरिया, १० नरभाण, ११ मालती, १२ पुरुबिया, १३ सूर, १४ मद्रेश, १५ संकरेश, १६ भूरेश, १७ बलेश, १८ तुपेराह, १९ कचेराह, २० रोसीहा, २१ चंद, २२ नकुंप, २३ भावर, २४ बाणकट.

## ९ *चालोक्य अथवा साळुंखे.

हा वंश भारद्वाज गोत्री असून, सामवेदी आहे. यांचें मूलस्थल लाहोर होय. हा वंश, परमार व चव्हाणवंशाप्रमाणें कीर्तिमान् आहे हें सर्वत: मान्य व ग्राह्य आहे. इ० स० च्या ८ व्या शतकांत ह्या वंशाचें राज्य मुलतान व इतर आसपासच्या प्रदेशांत होतें, व त्याचे भाटी राजाशीं फार वेळ युद्धप्रसंग झाले. आणखी अशीही माहिती उपलब्ध आहे कीं, हे राजे कल्याणास राज्य करीत होते, व अन्हिलपूरकर चावडा वंशांतील राजास पुत्रसंतति होणेची आशा न राहिले कारणानें, त्याचे मांडीवर दत्तक देऊन, पितृपोषण व राज्यसूत्र यथान्याय व यथाविधि सुयंत्रपणें चालावें ह्मणून कल्याणाहून ह्या राजघराण्यांतील एका राजबाळास ( मूळ राजास ) नेलें होतें.

संवत् ९८७ ( इ० स० ९३१ ) त चावडा वंशांतील शेवटचा राजा भोज यास एकीकडे टाकून, व हिंदुस्थानांतील गृहकायद्याच्या अंतर्गत असलेल्या दत्तविधान व इतर अशाच प्रकारच्या रीतिभातीस झुगारून, मूळराज साळोखी नामें राजपुरुषास आन्हिलपूर पट्टणच्या गादीचा मालक केलें. ह्यानें राज्याचा उपभोग सतत ५८ वर्षे घेतला. याचा मुलगा व राज्याचा अधिकारी चामुंडराय याचे हातीं राज्यसूत्र असतां, गिझनीच्या महमदानें हिंदुस्थानांत पुंडावे सुरू केले ; व जिकडे तिकडे प्रदेश उद्ध्वस्त करून लोकांची दैना करून सोडिली. याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानाची वाट लावून या क्रूर बुद्धि यवनानें, आपली यमदृष्टि दक्षिणेकडे फेंकली. दक्षिणेंत अन्हिलपूरच्या आसपास सारखा दंगा माजवून प्रांताचे प्रांत लुटून सफा केले. हिंदुस्थानांतून अपरंपार संपत्ति लुटून नेऊन, गिजनी शहर प्रत्यक्ष अलकापुरीच करून सोडिलें; तथापि या राजाचे पिढींतील सिद्धराय जयसिंह राजा राज्य करीत असतां, राज्यांतील लोक द्रव्यसागरीं पोहोंतच होते, व जिकडे तिकडे आराम,

* ह्या चालुक्य वंशाची मूळ उत्पत्ति कशी झाली, याविषयींची माहिती वे० शा० सं० बाळशास्त्री तोरो यांनीं केलेल्या आमच्या इतिहासांत प्रथमच लिहिली आहे.

शांतता, सुख, व न्याय हे यथाविभाग प्राप्त होत होते. याविषयीं प्रसिद्ध भूगोलशास्त्रवेत्ते कोणी अरबजातीचे अल्इद्रिसी नांवें गृहस्थ असें लिहितात कीं, आपण सिद्धरायाचे दरबारीं गेलों होतों. तेथें सत्कार फार चांगला झाला. हा राजा बुद्धधर्मानुयायी असून, प्रत्यक्ष यास कुबेरानुज ह्मणणें कदापिही गैर होणार नाहीं. याचे राज्यांत व्यापाराची मोठी घडामोड चालत असून, पूर्व पश्चिम देशांतील मालांची अन्हिलपूर उतारपेठ ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

या सिद्ध राजाचे अमलाखालीं, थेट कर्नाटकापासून तों उत्तरेस हिमालयापर्यंत एकंदर २२ राज्यें होतीं. पुढें त्याचे मूढ वंशजानें पृथ्वीराजाशीं युद्धप्रसंग करून, आपला आपणच पायावर धोंडा मारून घेतला. अपयश त्यांच्या माथीं बडवलें व राज्यांत सगळी अव्यवस्था झाली, शेवटीं पृथ्वीराजानें राज्य बळकाविलें व येणेंकरून कुमारपाल चव्हाणाचा या साळुंखे वंशांत समावेश झाला. हा कुमारपाल साळोखी पगडीच वापरीत असे. ह्या वंशांतील सिद्धराज व कुमारपाल यांचे काळांत, शिल्पकला उन्नत्तीच्या शिखरास जाऊन पोंचली. राजाश्रय ह्या कलेस उत्तम प्रकारचा मिळालेकारणानें, मोठमोठ्या इमारती बांधल्या गेल्या. येणेंकरून शिल्पकला शास्त्राध्ययनाचा भाग ही भरतभूमि झाली. हें राजद्वय बुद्धानुयायीच होतें. त्याकाळच्या इमारतीवरून बुद्धधर्मप्रसाराची मजल कोठपर्यंत पोंचली होती, हें धर्मकालविदांच्या ध्यानीं येणेंसारखें आहे.

शहाबुद्दीनच्या सेनापतींनीं ह्या राजाच्या कारकीर्दीचे शेवटीं शेवटीं राज्यावर स्वाऱ्या करून व अनेक प्रकारें त्रास देऊन पुष्कळ मुलूख बळकाविला. ह्या योगें १२२८त हिंदूंची फार दैना झाली; परंतु पुढें कोणी सिद्धराजवंशकुलदीप बिसलदेव राजा झाला. त्याणें आपल्या मर्दुमकीनें, युद्धचातुर्यानें, आणि अक्कलहुषारीनें गेलेलें वैभव पुनः संपादन करून, सर्व राज्य रंगारूपास आणिलें. याचे कारकीर्दींत डल्फस राज्याप्रमाणेंच सोमनाथचा उदय झाला. एकंदरींत हें राज्य विद्या, कला, द्रव्य, शौर्य इत्यादि गुणवैशेष्यांनीं शिखरास जाऊन पोंचलें; परंतु तद्देशीय विसलदेवापासून चौथ्या पुरुषांनीं ह्मणजे

कर्णघेल याचे कारकीर्दीत सर्व कांहीं विचित्रच झालें. कोणा दुसऱ्या अल्लाउद्दीन नामें सरदाराच्या सैन्याची धाड याचे राज्यावर येऊन पडली. सैन्यानें अन्हिलपूर सफा करून टाकिलें. फार तर काय, तेथील शहर वसल्याचीं चिन्हेंसुद्धां नाहींशीं केलीं! दिल्ली येथील तार्तर सरदारांनीं गुजराथ व काठेवाड प्रांतांची वाट लाविली. पैशाची लूट केली, धर्म बुडविला, स्त्रीपातिव्रत्याचा भंग केला, यवनांनीं आपली इसलामी जारीनें सुरू केली, धर्मप्रसारार्थ पैगंबर महंमदाचें अनुकरण केलें, मोठमोठीं पवित्रस्थानें, सुशोभायमान मंदिरें, मूर्तिकारांनीं आपली कर्तबगारी खर्च करून तयार केलेल्या अप्रतिम, सतेज, मनोहर, दिव्य, आनंददायी आणि पूज्य अशा प्राणप्रतिष्ठित मूर्ति भ्रष्ट करून त्यांचे तुकडे तुकडे करून टाकिले!! ह्याप्रमाणें ह्या साळुंखी वंशाची अशी वाट लागून त्याचें नांव परागंदा झालें!!! ह्या शतकांत गुजराथेमध्यें कोणी राजा झाला नाहीं; तथापि कोणी टाक वंशापैकीं इसलामपंथी ( मुसलमानी धर्माचा ) जाफरखानानें गुजराथेंत तरवारीच्या जोरावर आपलें राज्य स्थापिलें. ह्याच जाफरखानाचा महमद नामें मुलगा अहमदाबादचा मूलस्थापक होय.

ह्यांचे वंशज गुजराथेमध्यें चोहोंकडे पसरले आहेत, व भगेलखंडांत यांच्यापैकीं एक वंश सध्यां राज्य करीत आहे. या साळुंखी वंशाच्या शाखा १६ आहेत, त्या येणेंप्रमाणें:—

१ भगेले. ही शाखा भगेलखंडांत असून, त्याची राजधानी बांधवगड आहे. पित्तपूर ( पेथा ), ठराद व अढालज वगैरे ठिकाणचे राव हे याच शाखेंतील होत.

२ वीरपूर. लुनावाडचे राव.

३ विहिल ( बेहिला ). हे मेवाडांतील कल्याणपूरचे राव आहेत, व हे साळुंवरचे संस्थानिकाचे ताबेदार होत.

४ भुरटा } हे जेसलमीर, काहीर, टेकरा आणि बरू येथचे
५ कलाचा } राहणारे.

६ लंगहा. हे मुलतानचे आसपासचे राहणारे असून, मुसलमान झाले आहेत.

७ तोगर } या शाखांचे पुंजनद येथचे रहिवासी असून हे मुसल-
८ ब्रीकु } मान झाले आहेत.

९ सुरकी. दक्षिणेंत.

१० सिरवरीय. सौराष्ट्र येथील गिरनार प्रांतीं राहणारे.

११ राओरव. जयपूर राज्यांतील दोडा प्रांत येथचे राहणारे.

१२ राणीकिया. मेवाडांतील देसुरी.

१३ खरूरा. माळव्यांतील जावडा व अलोट प्रांतीचे रहिवासी.

१४ ताणतिया. चंदभर शाकंबरी येथील.

१५ आलमेच्छा. पत्ता नाहीं.

१६ कुलमार. गुजराथेंत.

## १० परिहारवंश.

हा वंश अग्निकुलांपैकींच होय. यांतील राजे दिल्लीपति तुवरवंशीयाचे व अजमीरच्या चव्हाणाचे मांडलीक होते. ह्यांतील राजांच्या हातून नांवाजण्यासारखीं मर्द्दुमकीचीं कृत्यें घडून आलीं नाहींत. ह्या वंशांतील राहरराय नांवें मांडलीकानें, स्वस्वातंत्र्यरक्षणार्थ पृथ्वीराजाशीं मोठें रण माजवून, कांहीं यशही संपादिलें; तथापि शेवटीं त्याचा मोड होऊन स्वातंत्र्यांकुराची वाढ खुंटून, अगदीं तेथल्यातेथेंच तो करपून गेला. ह्या अपयशप्राप्तीनें त्याचें नांव लयास न जातां, उलट या प्रसंगाचें इतिहासकार व कवींनीं मोठ्या गंभीर भाषेनें वर्णन केलें आहे. मारवाडांत राठोड येणेचे पूर्वी त्या काळची मारवाडची राजधानी मंदवार येथें हे राज्य करीत असत. ही पुरातन राजधानी जोधपूरापासून अदमासें ९ मैलांवर असून, हल्लीं तेथें त्या कालचीं पुराणीं देवालयें, व मंदिरें आहेत व कोठें कोठें त्याचे आसपास पालीभाषेंतील शिलालेखही सांपडतात.

राठोडांनीं कनोजाहून पळ काढून परिहारांच्या आश्रयास येऊन

राहिले; परंतु पुढें ते आश्रयदात्यावर उलटले. त्या इतिहासप्रसिद्ध चंड नांवाच्या राठोडवंशीय सरदारानें, राजास पदच्युत करून मंदवार येथें राज्यध्वज उभारिला व आपल्या नांवाचें शिकामोर्तब सुरू केलें. ह्या परिहारांची जीर्णावस्था झाली, व त्यांच्या दुसऱ्या मुलुखावरहीं स्वारी केली, आणि तसेंच त्यांचेकडे चालणारा, राणा, हा किताब काढून आपल्या नांवास जोडिला. परिहार वंशाचा राजस्थानांत चहूंकडे प्रसार झाला आहे; तथापि ह्या वंशांतील स्वतंत्रपणें राज्य करणारा राजा मिळणें दुरापास्त आहे. हे वंशज शिंद्याच्या राज्याखालीं आहेत. थोड्या कालापूर्वी चंबळानदीचे आसपासचे प्रदेशांत चोऱ्या, दरवडे वगैरे दुष्कृत्यें करून आपला उदरनिर्वाह करीत असत; परंतु इंग्रज सरकारानीं त्यांचा चांगला बंदोबस्त करून, उत्तम दाब बसविला. ह्याच्या एकंदर १२ पोटशाखा असून, त्यापैकीं १ इंदुह व २ सिंदील, या दोन शाखा प्रसिद्ध आहेत, व कांहीं शाखा लुनीनदीच्या आसपास आहेत.

## ११ चावडावंश.

हा वंश मोठा शूर होऊन गेला. ह्या वंशाचें नांव सध्यां जरी भाट लोकांत फारच कमी निघतें; तथापि गाजविलेल्या शौर्यामुळें, हें हिंदुस्थानचे इतिहासांत चिरस्थायी झालें आहे; परंतु हे सूर्यवंशज अथवा इंदुवंशीय असावेत, याचा निर्णय करणें अशक्य असल्यामुळें, यांची मूळ उत्पत्ति शिथियन् लोकांकडेच लावणें इष्ट दिसतें; तरी वल्लभीपूर येथें राज्य करीत असतां, ह्या कुलांतील वंशजास मेवाडचे सूर्यवंशी राजांनीं आपल्या मुली देऊन, त्यांच्या मुलींशीं आपला संबंध केल्याची माहिती मिळते.

एकवेळ यांनीं काठेवाडचे किनाऱ्यावर दीव बंदर येथेंही राज्य केलें. ह्या दीवच्या राजास चांचे व आरब लोकांनीं फार त्रास दिला. या वंशांतील राजांनीं, संवत् ८०२ ह्मणजे इ० स० ७४६ मध्यें, अन्हिलपूरपट्टण नांवें नगरी स्थापन केली, आणि नंतर वल्लभीपूर येथील तक्त हालवून, पट्टण येथें राजधानी केली. या गादीचा मूल स्थापक

वेनराजा होय. याचे वंशजांनीं एकंदर १८४ वर्षे राज्योपभोग घेतला; पण या वेनराजापासून ७ वा पुरुष भोजराजा यास राज्यपदच्युत करून, त्याच्या पुतण्यानें राज्य बळकाविलें. या काळांत चितोडवर मुसलमान राजांनीं हल्ले वगैरे करून फार त्रास दिला. त्याकाळीं कोणा चावडे वंशीय एका शूर राजानें, चितोडकरास साहाय्य केल्याचा उल्लेख 'खुमानसारा' बखरींत केला आहे; परंतु मुसलमानानीं शेवटीं हें राज्य पालथें घातलेंच. महंमद गिझनीनें काठेवाडावर स्वारी करून, अन्हिलवाड हें राजधानीचें शहर हस्तगत करून घेतलें व तेथील राजास हांकून देऊन चावडे कुळांतील एका पुरुषास गादीवर बसविल्याची हकीकत प्रसिद्ध मुसलमान इतिहासकार फिरस्ता याणें, आपल्या इतिहासांत वर्णन केली आहे. या वंशांत वर्णसंकर अगदीं झाला नाहीं. हे यदुवंशीय असावेत असें कांहींचें मत आहे. हिंदुस्थानांत हें कुळ कोठें प्रसिद्ध नाहीं. उदेपूरच्या राण्याचा वंश सर्व रजपूतांत उच्च मानिला आहे व ह्या वंशाचा या चावडे घराण्याशीं आजपर्यंत संबंध जाहला यावरून, अर्थातच चावडेकूळ नीच मानणें अगदीं चुकीचें होईल. हल्लीं रजपूतांत हें जातिवंत कूळ मानितात. या कुळाच्या हातून इतिहासप्रसिद्ध कांहीं गोष्टी न झाल्यामुळें, त्यांनीं प्राचीनकाळीं गाजविलेल्या पराक्रमाचें अभिनंदन करून स्वस्थ बसणें भाग येतें.

## १२ टाक व तक्षक.

हे टाकवंशीय मूळपुरुष शिथियन लोकांपैकीं असून फार शूर होते. शिकंदर बादशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली; त्यावेळीं ह्या टाक लोकांचें शौर्य पाहून, यांस सैन्यामध्यें मोठमोठ्या जागा दिल्या. हे शिकंदराच्या स्वारींत इकडे आल्यानंतर, सिंध प्रांतांत येऊन राहिले. हिंदुस्थानांत आल्यावर त्यांस शक असें नांव पडलें. पुढें भाटी क्षत्रियांनीं यांस सिंध प्रांतांतून हांकून दिलेवर ते दक्षिणेंत येऊन राहिले. प्रसिद्ध शककर्ता शालिवाहन राजा याच वंशांतील होय. अबूखंड नामें पुराणांत असें लिहिलें आहे कीं, या तक्षकाचा सरदार

शेषनाग यानें चितोड हस्तगत केलें होतें. हा चितोड किल्ला पुढें गेहलोट वंशीयांनीं त्यांचे हातून घेतला. अशीरगडच्या टाकाशीं मुसलमानांनीं युद्धप्रसंग केल्याबद्दल लेख आहेत. पुढें मुसलमानांनीं हिंदुस्थानांत स्वधर्म स्वीकारण्यासाठीं हिंदूंस त्रास दिला, त्यावेळीं टाकवंशांतील राजे मुसलमान झाले. या मुसलमान बनलेल्या टाकांपैकीं एकानें अहमदाबाद येथें राज्य केल्याची माहिती मिळते.

## १३ जितवंश.

जितलोक रजपूत असून, ते हल्लीं पंजाबांत शेतकीवर उपजीविका करीत आहेत. ह्यांस सौराष्ट्रांत जाट असें नांव आहे. हे समरकंदाकडे असतां तैमूरलंगानें त्रास दिला व यांस मुसलमान केलें.

## १४ हूणवंश.

हूण लोकांची मूळ उत्पत्ति शिथियन् लोकांपासून झालेली आहे. यांनीं क्षत्रियांस फार साहाय्य केलें आहे. ह्यावरून यांस क्षत्रियच ह्मणतात. पुढें हे बलिष्ठ झाले. कांहीं काळानें बहारच्या राजानें यांच्याशीं युद्धप्रसंग करून यांचा चांगलाच पिच्छा पुरविला. चितोडावर मुसलमानांनीं पहिल्यानें स्वारी केली; त्यावेळीं हूणवंशांतील राजा तेथें राज्य करीत होता. हे हूण अजूनही उत्तर हिंदुस्थानांत कोठें कोठें आढळतात.

## १५ काठीवंश.

यांच्या प्राचीन इतिहाससंबंधानें राजस्थानांतील व सौराष्ट्रांतील वंशशोधकांनीं आपल्या ग्रंथांत बरीच माहिती दिली आहे. यांची सौराष्ट्रांत वस्ती झाल्यामुळें, त्यास काठेवाड अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. इ० स० च्या ८ व्या शतकांत हे काठेवाडांत येऊन राहिले असें यूरोपियन् इतिहासकारांचें मत आहे. पृथ्वीराजाच्या सैन्यामध्यें यास मोठमोठे अधिकार होते. काठी हे सूर्यपूजक होत. हे घोड्यावर बसण्यांत फार पटाइत होते, व लुटारू ह्मणून यांची फार ख्याति आहे.

## १६ बालावंश.

हे आपल्यास सूर्यवंशी ह्मणवितात. आपला मूळपुरुष बापा हा, श्रीरामपुत्र लव याचा वंशज होय, असें त्यांचें ह्मणणें आहे. पहिल्यानें हे सिंधु नदाचे आसपास राहत असून अरोर येथें राज्य करीत असत. तेथून पुढें वल्लभीपुरांत हे येऊन राहिले, अशी कांहीं लेखांत माहिती मिळते.

## १७ झालावंश.

ह्या वंशांतील पुरुषास रजपूत ह्मणतात. अकबराचा व राणा प्रतापसिंहाचा संग्राम झाला त्या वेळीं, या कुळांतील एका प्रतापी पुरुषानें राजा प्रतापसिंहाची बाजू संभाळल्यामुळें, प्रतापसिंहास जय आला. या उपकाराची फेड, राण्यानें आपली मुलगी त्या सरदारास देऊन, आपले उजवे बाजूस बसणेचा मान दिला. कोटी संस्थानचे मालक, झाला वंशांतील असलेकारणानें, त्या संस्थानास झालावाडा असें नांव पडलें आहे. याच्या पुष्कळ शाखा झाल्या असून, त्यापैकीं मखवाहन ही प्रसिद्ध आहे.

## १८ जेठवावंश.

हा फार जुना वंश असून, निरनिराळ्या आधारावरून हे रजपूतच असावेत, अशाबद्दल कांहीं संदेह नाहीं. या कुळाची काठेवाडांत वस्ती असून, पोर बंदरचा राणा याच कुळांतील होय. याची भरभराटी इ० स०चे ८ वे शतकापासून झाली असावी. ते आपणास मारुती-वंशज ह्मणवितात.

## १९ गोहिलवंश.

हा वंश सूर्यवंशी असून, हे मारवाडांत राहत असत. यांचें या ठिकाणीं किती कालपावेतों वास्तव्य होतें, हें सांगतां येणें कठीण आहे. पुढें सौराष्ट्रांत आल्यावर, पेरमगड येथें येऊन राहिले. हे ज्या प्रांतीं होते, तो प्रांत सौराष्ट्रदेशाचे पूर्वेस असून त्यास गोहिलवाड असें नांव आहे.

## २० सारवियावंश.

या वंशासंबंधानें हल्लीं कांहीं माहिती मिळत नसून, सध्यां प्रसिद्ध असलेल्या दंतकथावरतीच विश्वास ठेविल्यास, पूर्वकालीं या वंशाची महान् प्रसिद्धि होती, असें ह्मणणें भाग येतें. ह्या आमच्या मतास, या वंशाचें वर्णन असलेल्या भाट लोकांचे कवनावरून, पाठबळ मिळत आहे; तथापि उगाच तर्क करणें युक्त नव्हे.

## २१ शिलारवंश.

हें राजकुळ फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. दोन हजार वर्षांपूर्वी आलेल्या आरबी ज्योतिषी व इतिहासकार यांनीं आपल्या ग्रंथांत ह्या वंशाचा उल्लेख केला आहे. यांचें वसतिस्थान सौराष्ट्रदेश होय. ह्यांस सिद्धराजानें पुढें हांकून दिलें. हल्लीं दक्षिणेंत शेलार आडनांवानें जे प्रसिद्ध आहेत, ते याच वंशांतील होत.

## २२ दावींवंश.

याची सध्यां कोठें माहिती मिळत नाहीं; तथापि याची सौराष्ट्रांत एकेकाळीं प्रसिद्धि होती. हे सोमवंशी असावेत असें वंशशोधकांचें मत आहे.

## २३ गोहरवंश.

या राजकुळांतील पुरुष बंगाल्यांत राज्य करीत असत. पूर्वी राजस्थानामधील राजेरजवाड्यांत यांस मानीत असत; तथापि त्यांनीं आपलें तेथें वसतिस्थान केल्याची माहिती कोठें नाहीं. पृथ्वी राजाच्या सैन्यांत अजमीरचे गोरे होते. हे पूर्वी मोठे शूर होते. पुढें वैष्णव झाले. यांणीं मांसाहार सोडून दिला, आणि राधावासुदेवचरणीं लागले. यांचे सुपूर येथील छोटेखानी राज्य १८०९ मध्यें शिंद्यानें बळकाविलें.

## २४ दोडावंश.

हें राजकुळ पृथ्वीराज चव्हाणाचेवेळीं होतें.

## २५ गेहरवळवंश.

प्रथमतः ह्या कुळांतील राजे काशी येथें राज्य करीत होते. यात्र गेहेर कुळांतील बुंदेल नांवाची शाखा आहे. हे बुंदेले ज्या प्रांतीं राज्य करीत होते, त्या प्रांतास बुंदेलखंड असें ह्मणतात. यांनीं कलिंजर, मोहिनी व मोहबा हीं शहरें चंडोले यांजपासून हस्तगत करून तेथें राज्य केलें. चंडेले हे रजपूतांच्या छत्तीस कुळांपैकीं असून, इ० स० च्या बाराव्या शतकाच्या सुमारास यमुना व नर्मदा या नद्यांच्या मधील प्रदेशांत राज्य करीत होते. सध्यां ते बुंदेलखंड व भागेलखंड यांमध्यें मोडतात. चंडेलाचे पृथ्वी राजाशीं फारच युद्धप्रसंग झाले. शेवटीं त्यांचा पूर्ण पराभव झाला. पुढें गेहेरवळांनीं त्यांच्यावर चाल करून तेथें आपलें राज्य स्थापिलें. इ० सन १२०० मध्यें, ह्या गेहेरवळ वंशांतील पुरुष मनवीर बुंदेला चंडेलाचें राज्य करीत होता, अशी इतिहासांत माहिती आहे. याचेपासून तेरावा पुरुष मधुकरशहा यानें बिटवा नदीवर वोर्चा शहर वसविलें. त्याचा मुलगा पुढें त्याच्या गादीवर बसला, त्यानेंही आपलें राज्य थोडेसें वाढविलें. सध्यां वोर्चा हें शहर बुंदेलखंडांतील प्रसिद्ध शहरांत मोडतें. या मधुकर शहाची प्रसिद्धि होती; परंतु अकबराचा परमप्रिय व इतिहासकार अबूलफझल यास ठार मारल्यानें, त्याचा फार बदलौकिक झाला. मोंगलाच्या कारकीर्दींत बुंदेल याच्या वंशांतील वोर्चा व दतिया येथील सरदार मोठे शूर होते. भगवान् बुंदेला शहाजहानाच्या कारकीर्दींत सेनापति होता. त्याचा मुलगा सूपकर्ण औरंगजेबाचे कारकीर्दींत दक्षिणेकडील सैन्यावर मुख्य होता. हिंदुस्थानांतील प्रसिद्ध योद्धा महादजी शिंदा वारल्यावर, त्याच्या मागून दौलतराव शिंदा गादीवर बसला. त्याच्या बायका दतियाच्या राजाकडे आश्रयास गेल्या. दौलतराव शिंद्यानें, त्या स्त्रिया आपल्या ताब्यांत मिळाव्यात ह्मणून मागणें केलें. शेवटीं दतियाच्या राजानें नाकारल्यामुळें, त्यावर दौलतरावानें स्वारी केली. त्यांत त्याचा पूर्ण मोड झाला. बुंदेले हे उत्तरहिंदुस्थानांत चहूंकडे पसरले आहेत.

## २६ वीरगुजर.

हे सूर्यवंशी असून यांची ढुंडारप्रांतीं वस्ती होती. राजवरचा किल्ला यांचेच ताब्यांत होता. त्याप्रमाणेंच राजगड व अलवार हेही किल्ले त्यांचेच ताब्यांत होते. त्यांना कच्छवाहानीं हाकून लाविलें; नंतर गंगातीरीं अनपसर नांवें शहर स्थापून तेथें आपलें राज्य केलें.

## २७ सेंगार.

या लोकांविषयीं फारशी माहिती नाहीं. यमुनातीरीं जगमोहनपूर येथें हे राज्य करीत आहेत.

## २८ सिकरवळ.

या कुळांतील राजांचे हातून पराक्रमाचीं कृत्यें घडल्याची माहिती राजस्थानांत नाहीं. या वंशनामाची उत्पत्ति, त्यांचे मूळची राजधानी शिक्री यापासून झाली आहे.

## २९ बैस.

या वंशास छत्तीस कुळांत गणतात; तथापि चंद अथवा कुमारपाल-चरित यामध्यें, सूर्यवंशांतीलच हा वंश एक शाखा आहे असा उल्लेख आहे. हल्लीं यमुना व गंगा यांमधील प्रदेशांत या कुळांतील लोक राहतात.

## ३० दाहिया.

हा वंश फार जुनाट असून, सिंधुनदाचे काठचे प्रदेशांत यांची वस्ती होती. सध्यां त्यांची कोठें माहिती नाहीं.

## ३१ जोहिया.

दाहियाच्याचवेळीं हा जोहियावंश प्रसिद्ध होता. कांहीं काळा पर्यंत हिंदुस्थानचे अरण्यांतील प्रदेशांत राज्य केल्यामुळें, जंगलदेशा-धिपति असें नांव पडलें होतें. सध्यां यांचा कोठें शोध नाहीं.

## ३२ मोहिल.

यांची उत्पत्ति शिकंदराचे शत्रू माली यांचेपासून झाली असावी असें कांहीं ग्रंथकारांचें मत आहे. हे मुलतानास होते.

## ३३ निकुंपा.

हें कूळ गेहलोटाच्या आधीं होऊन गेलें. यांचे ताब्यांत मंडळगड व त्या सभोंवारचा प्रदेश होता.

## ३४ राजपाली.

यांची मूळोत्पत्ति शिथियन् लोकांपासून असावी असें कित्येकांचें ह्मणणें आहे, व एकेवेळीं हे सौराष्ट्रांत असावेत, असेंही कांहीं ग्रंथाधारें समजतें.

## ३५ दाहिमा.

हे पृथ्वीराज चव्हाणाचे मांडलिक होते. ह्यांपैकीं बंधुत्रयांनीं मोठे पराक्रम करून, पृथ्वीराजाच्यावेळीं मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळविल्या. यांतील सगळ्यांत मोठ्या भावानें, प्रधानकीचीं वस्त्रें मिळविलीं व आपलें नांव चिरस्थायी केलें; परंतु शेवटीं त्याची फार दैना झाली. दुसरा भाऊ पंदीर हा लाहोर प्रांताचा सुभेदार होता. शेवटला भाऊ चंदराय हा पृथ्वीराजाच्या शेवटल्या स्वारींत होता. तो फार शूर असल्यानें त्यास सैन्याचा मुख्य सेनापति केला होता. या बंधुत्रयाची मर्दुमकी व कर्तबगारी मुसलमानी इतिहासांत फार वर्णिली आहे. चव्हाणवंशाची समाप्ति झाली, तेव्हांपासून ह्या वंशाचें नांव कोठें आढळत नाहीं.

याप्रमाणें वर दिलेल्या शाखा व वंश यांचें वर्णन अल्प विस्तारानें इतिहासादिकांवरून सादर केलें आहे. हे राजपुरुष शूर व मोठे पराक्रमी होऊन गेले, हें वाचकांच्या सहजच ध्यानांत येण्यासारखें आहे.

# अलीकडील मराठे यांचा पूर्वापार संबंध, गोत्र व कुळें.

चंद्रवंशांतील सोमशर्मा राजा याचे पुत्र ६, हे त्या वंशावळींत नमूद केले आहेत. त्यांतील पहिला पुत्र चव्हाण, त्याचें गोत्र वगैरे माहिती खालीं लिहिल्याप्रमाणें. ही माहिती फक्त आमचेकडे वंश-संबंधीं एक जुनें पुस्तक आहे, त्यांतच मिळती. दुसरे ग्रंथांत अद्यापि उपलब्ध झाली नाहीं; परंतु श्री० हिंमतबहादर यांचे पुरोहित, यानींही एक जुनें पुस्तक दिलें आहे, त्यामध्येंही याचप्रमाणें आहे. या दोन ग्रंथाधारें माहिती लिहिले आहे.

## १ चव्हाण.

प्रथम पुत्र चव्हाण, गोत्र वसिष्ठ, यजुर्वेद, कुलदेवता ज्वालामुखी व ज्योतिलिंग (जोतिबा), देश अवंति व मेवाड. आतां चव्हाण याचे जातिभेद झालेले खालीं लिहिलेप्रमाणें:—

१ चव्हाण, २ मोहिते, ३ भावकर, ४ खांडेकर, ५ लाड, ६ डुरे, ७ रणदिवे, ८ काळभार, ९ वाकडे, १० तांबे, ११ टाकरे, १२ गव्हाणे, १३ धडम, १४ वारंगे, १५ दळपते. येणेंप्रमाणें चव्हाणाचे जातिभेद आहेत. विजयादशमीस शस्त्र पूजा खांडा, श्वेत-भूषण, श्वेत सिंहासन, श्वेत वाहन, श्वेत ध्वज. वर सांगितलेले जातिभेद, गोत्र वगैरे विचार करून, विवाह करणेचे ते करावेत. लग्नकार्याचेवेळीं देवकांत स्थापन करणेचा वासनवेल ( वासुंद्री ), यज्ञो-पवीत घालणें, व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## २ मोरे.

दुसरा पुत्र मोरे, याचें गोत्र गौतम, यजुर्वेद, कुलदेवता गणपति. देवकांत स्थापन करणेचें मोराचें पंख. देवकाबरोबर वेताची पूजा करावी, व देवकांत ३६० दिवे लावावेत. देश अवंती, नगर कांचन. हिरवें व लाल आभरण वस्त्र, घोडा, निशाण असें असणेचें, व

ध्वजीं मयूरचिन्ह. विजयादशमीस शस्त्र कट्यार पुजणें. मोरे याचे जातिभेद खालीं लिहिलेप्रमाणें:—

१ मोरे, २ सावळे, ३ माडीक, ४ मारभे, ५ आवळे, ६ मर्डे, ७ भुडके, ८ देरकर, ९ पाडवेले, १० अधचारे, ११ दुडुस्कर, १२ माखमखाळे, १३ केशकर, १४ कल्पाते, १५ दरबारे. येणें-प्रमाणें जातिभेदाचा शोध करून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें, व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## ३ पवार.

तिसरा पुत्र पवार, याचें गोत्र वसिष्ठ, यजुर्वेद, कुलदेवता हनुमंत किंवा भैरव. देवकांत स्थापन करणेचे पांच पल्लव, ते:—आंबा, जांबळ, उंबर, शमी ( संवदड ), रुचिक व देवकांत देवी खंडेश्वरी. नगर धारागिरी, अबूगड. आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा हे लाल असून, निशाणहि लाल असणेचें. विजयादशमीस तरवार पुजणें. पवार याचे जातिभेद खालीं लिहिलेप्रमाणें:—

१ पवार, २ निंबाळकर, ३ वाघ, ४ वागमोडे, ५ वागचवडे, ६ जगदाळे, ७ गुजर, ८ कोडग, ९ लाडगे, १० वोगे, ११ साकळे, १२ बोधे, १३ वोधे, १४ ढवळे, १५ मळे, १६ काळगे, १७ हरणे, १८ कराळवर, १९ धारराव, २० दळवी, २१ कदम, २२ पोळवे, २३ विचारे, २४ सालव. येणेंप्रमाणें पवार याचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें, व क्षात्रधर्मानें वर्तणूक करणें.

## ४ राष्ट्रकुंड.

राष्ट्रकुंड हा चवथा पुत्र, याचें गोत्र गर्ग, यजुर्वेद, कुलदेवता गिरिजावती जोगेश्वरी. देवकांत स्थापन करणेचा शंख. नगर संकावती. आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण हीं लाल-

असून, ध्वजीं शंखचिन्ह असणेचें. विजयादशमीस तरवार पूजाव-याची राष्ट्रकुंड याचे जातिभेद खालीं लिहिलेप्रमाणें:—

१ रायजोदे, २ मगावले, ३ अवंगपाळ, ४ अनंगपाळ. या चौघांपासून चोवीस कुळें झालीं तीं येणेंप्रमाणें:— १ जगन्निवास, २ गडवर्ग, ३ गडगोपाळ, ४ भाले, ५ भयासूर, ६ अभोरे, ७ भोरे, ८ संक्पाळ, ९ वादले, १० लहुडे, ११ तोडमले, १२ खंडागळे, १३ दुतोंडे, १४ दुर्धरे, १५ लंड, १६ भंड, १७ चंड, १८ पाच-पारे, १९ पाचपुते, २० सातपुते, २१ पंचानन, २२ सिनागारे. येणेंप्रमाणें राष्ट्रकुंड याचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें, व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## ५ धामपाळ.

पाचवा पुत्र धामपाळ, याचें गोत्र काश्यप, यजुर्वेद, कुलदेवता जोगेश्वरी. याचे जातिभेद वगैरे या ग्रंथांत उपलब्ध नाहींत.

## ६ अनंग ( अहीरजाधव ).

सहावा पुत्र अनंग याचें गोत्र अत्रि, यजुर्वेद, कुलदेवता चौंडेश्वरी, जोतिबा व खंडेराव. देवकांत स्थापन करणेचे काटोठ, कदंब. स्थान गडदेवगिरी, आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण हीं मावेरंगाचीं असून ध्वजीं गायत्रीचिन्ह असणेचें. अहीराचे जातिभेद येणेंप्रमाणें समजावेत, ते.—१ अहीर, २ जाधव, ३ यादव, ४ माधव, ५ अभग, ६ अंधक, ७ भोजक, ८ सत्पळ, ९ तमाले, १० अबुद, ११ किरदंत, १२ डांगे, १३ अवरे, १४ खिलारे, १५ दुभगे, १६ वीरदंत, १७ कोकरे, १८ कवतुके, १९ कोल्हाळे, २० कसाळे, २१ ताडे, २२ साडे, २३ ततगडे, २४ गवडे, २५ कल्याणकर, २६ गावडे, २७ शिरके, २८ ठोमरे, २९ काथवटे, ३० शूरसेन, ३१ भानवसे, ३२ दुनगे, ३३ हानमाने, ३४ कबाळे, ३५ जालिं-धरे, ३६ जसवंत, ३७ जगपाळ, ३८ पाटील, ३९ जागले, ४० जारे, ४१ धूमक, ४२ घोगले, ४३ सीरगोरे, ४४ धरत. यांचे

कुळीं विजयादशमीस तरवार पुजणेची. येणेंप्रमाणें अहीर यादव यांचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

चंद्रवंशांतील सोमशर्मा राजाचे पुत्र ६ व त्यांचे जातिभेद, गोत्र, देवता वगैरे जुने लेखी पुस्तकांत लिहिले आहेत, त्याप्रमाणें येथें प्रदर्शित केले आहेत. सूर्यवंशांतील सुमित्र राजा याचे पुत्र सात. हे त्या वंशावळींत नमुद केले आहेत. त्यांतील पहिला पुत्र कदम, त्याचें गोत्र वगैरे माहिती खालीं लिहिल्याप्रमाणें.— *

## १ कदम.

पहिला पुत्र कदम, याचें गोत्र कपिल, यजुर्वेद, कुलदेवता तुळजा-भवानी, देश प्रभावती, नगर केदार, देवक कळंबाचे तळीं, आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण व ध्वज हे लाल असणेचे. विजयादशमीस खंजीर पूजणेचा. आतां कदम याचे जातिभेद पुढें लिहिलेप्रमाणें जाणावेत. १ कदम, २ अवाडे, ३ गागुळे, ४ कळंब. ५ शेंडगे, ६ भिसे, ७ भुळ, ८ घारडे, ९ काजळ, १० कारळे, ११ वराडे, १२ बाडके, १३ अखडे १४ अवटे. येणें-प्रमाणें कदम याचे जातिभेद जाणून लग्नकार्याचे वेळीं वर्तावें. यज्ञो-पवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणें.

## २ निकम.

दुसरा पुत्र निकम, याचें गोत्र पराशर, यजुर्वेद, कुळदेवता तुळजा-भवानी, देश प्रभावती, देवक कळंबाचे तळीं, आभरण, भूषण, निशाण, हें हिरवें, लाल, पिंवळें या तीन वर्णांचें. विजयादशमीस खांडा

* ही माहिती आमचेजवळ वंशसंबंधीं जें जुनें पुस्तक आहे त्यांत मिळते. तसेंच श्रीमंत हिंमतबहाद्दर यांचे पुरोहित वे० शा० रा० पुरुषोत्तमशास्त्री माळवणीकर यांनींहि एक जुनें पुस्तक दिलें आहे, त्यामध्येंहि याचप्रमाणें माहिती आहे. अशा या दोन ग्रंथांच्या आधारें ही माहिती लिहिली आहे.

[library stamp]

पुजणेचा. आतां निकम याचे जातिभेद.—१ निकम, २ दांडगे, ३ मसके, ४ कौस्तुभे, ५ दुबोले, ६ तिबोले, ७ वरग, ८ सावळे, ९ कंकाळे, १० कोलाळे, ११ रक्के, १२ धराते, १३ स्वराते, १४ निकळंक, १५ गुज, १६ गुडे, १७ तवार, १८ बुडारे. येणेंप्रमाणें निकम याचे जाति व गोत्रें याचे भेद जाणून. लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वागणें.

## ३ धीटक.

तिसरा पुत्र धीटक, याचें गोत्र अगस्ति, यजुर्वेद, कुळदेवता जोगेश्वरी, देवकीं शंख स्थापन करणेचा, विजयादशमीस तरवार पुजणेची. आतां याचे जातिभेद.—१ धिडक, २ मासकर, ३ मडीकर, ४ मडुकरे. येणेंप्रमाणें जातिभेद जाणून लग्नकार्य करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## ४ काळमुखी.

चवथा पुत्र काळमुख, याचें गोत्र कश्यप, यजुर्वेद, कुळदेवता प्रभाकर, देवक सूर्याच्या काड्या व सूर्यकांताचीं फुलें, भूषण, आभरण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण, हीं पांढरीं व लाल अशा दोन रंगांचीं असणें, विजयादशमीस तरवार पूजा. याचे जातिभेद.—१ काळमुख, २ घाटगे, ३ रणवागुर, ४ कार्मुक, ५ जाचक, ६ अवचारे, ७ सितोळे, ८ गायकवाड, ९ सूर्यवंशी, १० भोजने, ११ सुरवे, १२ राचोडे, १३ ढमढेरे, १४ जीतकर, १५ काकडे, १६ हंडे, १७ फाटक, १८ गोरे, १९ खुळे, २० किकाटे, २१ नाडे, २२ गुरुसाडे, २३ भांडोलकर, २४ गोडवे, २५ ह्माडीक, २६ थोरात, २७ लोखंडे, २८ खांडेकर, २९ केसकर, ३० तुपे, ३१ झुंझारराव. येणेंप्रमाणें काळमुख याचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत धारण करणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## ५ शेलार.

पांचवा पुत्र शेलार, याचें गोत्र विश्वामित्र, यजुर्वेद, कुळदेवता,

पात्रपालवी देवकांत स्थापन करणेची, विजयादशमीस खंजीर पूजणें. आतां याचे जातिभेद.—१ शेलार, २ शेंडगे, ३ नलगे, ४ थोटे. येणेंप्रमाणें शेलार याचे जातिभेद जाणून. लग्नकार्य वगैरे जें करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वागणें.

## ६ प्रोकट.

सहावा पुत्र प्रोकट, याचें गोत्र अंगिरा, यजुर्वेद, कुलदेवता, देवकांत स्थापन करणेचे, विजयादशमीस तरवार पूजणेची, छत्र, निशाण वगैरे. आतां याचे जातिभेद.—१ प्रतीहार, २ परिहर, ३ रसाळ, ४ दैरे, ५ सैलादर, ६ इसइडगे, ७ ढिले, ८ वाडागरे. येणेंप्रमाणें प्रोकट याचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वागणें. सातवा पुत्र प्रतिहार याचा व प्रोकट याचा सर्व धर्म, जातिभेद व देवता, देवक, गोत्र, वेद वगैरे एकच असल्याकारणानें, पुनः सविस्तृत निराळें सांगणेचें कारण नाहीं. त्यातही एक असा विचार जाणावा कीं, सूर्यवंशी एखादे चुकले, तें आडनांवावरून ओळखावे व जें आडनांव चुकलें, तेथें गायकवाड असे आडनांव जाणावें व जेथें गोत्र चुकलें तेथें कश्यपगोत्र, देवता जोगेश्वरी, व देवकांत पांच पल्लव. याप्रमाणें या वंशावळींत जाणावें.

ब्रह्मवंशांतील चुलकियादिक राजे यांचेबद्दलची माहिती, वर नमुद केलेली जीं जुनीं २ पुस्तकें, त्यांमध्यें आहे. ती खालीं प्रदर्शित केली आहे.

## चालोक्य ऊर्फ सोळुंखी.

## १ चुलकिया.

प्रथम पुत्र चुलकिया, याचें गोत्र भारद्वाज, ऋग्वेद, कुलदेवता ब्रह्मनाथ, देवकांत स्थापन करणेचे पाचपालवी, कुंभारकुकडे आणि मयूर यांचीं पिसें ( पंखें ), विजयादशमीस तलवार पूजावयाची, आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, निशाण हें सर्व पिंवळें असून ध्वजीं

त्रिशूल असणेचा. आतां याचे जातिभेद चुलकिया.—१ साळोंखे, २ रणनवरे, ३ रणखांबे, ४ सोनवते, ५ चोर, ६ चोरडे, ७ फडतरे, ८ लोंडे, ९ खांदारे, १० इंगळे, ११ इंदलकर, १२ बाबर, १३ इंगवले, १४ पिसाळ, १५ ढिसले, १६ कळसकर, १७ बिरंजे, १८ संचाळे, १९ मगर, २० डुबल, २१ माहाले, २२ बागल, २३ गुजाटे, २४ सोकावत, २५ वाळे, २६ सांवत. येणेंप्रमाणें चुलकियाचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे जें करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

ब्रह्मवंशांतील पुरुषांनीं, विजयादशमीस पूजणेचीं हत्यारें आपल्या कुलाचाराप्रमाणें पूजावींत. तीं माहित नसल्यास, आह्मीं लिहिल्याप्रमाणें पूजावींत.

## २ दारिक.

दुसरा पुत्र दारिक याचें गोत्र कौशिक, ऋग्वेद, कुलस्वामी महादेव, देवकांत स्थापन करणेचे आंबा, वड, पिंपळ, हराळी, जांबूळ यांचे पांचपल्लव. विजयादशमीस खांडा पूजा, नगर चितोड, गड मेनागिरीपर्वत, मंडळदेश मेवाड, आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण हीं सर्व भगवीं असून, ध्वजीं पावथाप असणेची. आतां याचे जातिभेद.—१ दारीक, २ सीतोळे, ३ सिरसाट, ४ भादुरगे, ५ काटे, ६ भोसले, ७ भोइटे, ८ भोडवे, ९ खराडे, १० घोरपडे, ११ गौळी, १२ देवकर. येणेंप्रमाणें दारिकाचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे जें करणें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणें.

## ३ चांदेलवीर.

तिसरा पुत्र चांदेलवीर याचें गोत्र मुंजाळ, ऋग्वेद, कुलदेवता विष्णु, देवकांत स्थापन करणेचें गरुडाचें पंख, वीरछत्र, गरुडासन, विजयादशमीस तरवार पूजणेची, आभरण, भूषण, छत्र, सिंहासन हीं लाल असणेचीं. स्थान दशवंती ( देशअवंती ) विदचंड. आतां चांदेल

याचे जातिभेद.—१ गरुड, २ माने, ३ दाभाडे, ४ धनीक, ५ टके, ६ कवडे, ७ दमाले. येणेंप्रमाणें चांदेल याचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे जें करणें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणेची ; येणेंप्रमाणें जाणावें.

## ४ अनंगवीर.

चवथा पुत्र अनंग याचें गोत्र विश्वामित्र, ऋग्वेद, कुलदेवता ज्योतिर्लिंग, नगर प्रभोलखंड, देवकांत स्थापन करणेची वस्तु निर्गुडी, विजयादशमीस पुजणेचें हत्यार खांडा, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण हीं हिरवीं असणें. आतां अनंग याचे जातिभेद.— १ नलवडे, २ रणपिसे, ३ रणराक्षस, ४ जगमल्ल, ५ वयाळे, ६ टापाळ कराडे, ७ चिकने, ८ राउतराव. येणेंप्रमाणें अनंग नलवडे याचा भेद जाणून लग्नकार्य वगैरे जें करणें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणेची, असें जाणावें.

## ५ हरुबोबडा.

पांचवा पुत्र हरुबोबडा याचें गोत्र वैरुण्य, ऋग्वेद, कुलदेवता जोगेश्वरी, देवकांत स्थापन करणेचे पांचपालवी, विजयादशमीस तलवार पुजणेची. जातिभेद:—१ हरुबाबडा, २ जमदाडे, ३ नवले, ४ कपसे, ५ मडळे, इत्यादि जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## ६ धर्मराज.

सहावा धर्मराज नामक पुत्र याचें गोत्र अंगिरा, ऋग्वेद, कुलदेवता महादेव ; देवकांत स्थापना करणेचे वड, पिंपळ, हराळी, अंबा, जांबळ यांचे पल्लव ; विजयादशमीस पुजणेचें हत्यार खांडा, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण हे पांढरे व लाल असून, ध्वजीं नंदी असणेचा. आतां धर्मराज याचे जातिभेद.—१ ढोके, २ कानफाटे, ३ साटे, ४ पानसबळे, ५ पोळ, ६ तागमोगे, ७ राजहंस, ८ गाळे, ९ कपाळे, १० गुमर, ११ गुंजवटे, १२ चित्रवटे, १३ कावे, १४ महंते, १५ बुधे, १६

तुंगारे, १७ दुरात्मे, १८ सरकटे, १९ जोगदगे. येणेंप्रमाणें धर्मराजाचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे करणेचें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें. या ब्रह्मवंशीं एखादें आडनांव चुकलें असेल, तर तें स्वगोत्राशीं मिळविलें आहे असें समजावें. व गुरुगोत्र न कळलें, तर कश्यप गोत्र याप्रमाणें समजावें, असें व्यासवचन आहे. इति ब्र० वंशः स०.

शेषवंशांतील शालिवाहन राजा त्याचे पुत्र ५ कोरटादिक. याज-बद्दलची माहिती वर नमूद केलेलीं जीं जुनीं २ पुस्तकें त्यामध्यें आहे; ती खालीं लिहिलेप्रमाणें.—

शालिवाहनाचे पुत्र पांच. १ कोरटपाळ, २ हरितट, ३ मारव, ४ संक, ५ सदेव. या पांचांपैकीं पहिला कोरटपाळ याचे पुत्र सात. त्यांचीं नांवें :—१ टाक, २ कटक, ३ करटपाळ, ४ वंशपाळ, ५ सकूर, ६ हेमाडराज, ७ लाड. येणेंप्रमाणें सात. पैकीं पहिला टाक, त्या टाकाचा पुत्र सिंदा, त्याचें गोत्र कौंडिन्य, सामवेद, कुळदेवता कालिकादेवी व जोतिबा. देवकांत स्थापन करणेचे समुद्रमर्यादेचे वेल व आघाड्याचा ढाळा, नगर संकावती, गड संकोचन, विजया-दशमीस हत्यार खांडा पुजणेचें; आभरण, भूषण, सिंहासन, घोडा, निशाण, हीं लाल वर्णाचीं असून, ध्वजीं शेषचिन्ह असणेचें. आतां याचे जातिभेद :—१ शिंदे, २ दळवी, ३ नागटिळके, ४ कडु, ५ उपासे, ६ नागदिवे, ७ खलाटे, ८ ढोणे, ९ नागवड, १० कुराडे, ११ वनवे, १२ जांबळे, १३ लवटे, १४ भुजगे, १५ फणिंद्रे, १६ तळेकर, १७ नागने. येणेंप्रमाणें सिंदे याचे जातिभेद जाणून लग्नकार्य करणें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

शेषवंशांतील पुरुषांनीं, विजयादशमीस पूजणेचीं हत्यारें आपल्या कुलाचाराप्रमाणें पूजावीत. तीं माहित नसल्यास, आह्मीं लिहिल्याप्रमाणें पूजावींत.

## २ कटक.

दुसरा पुत्र कटक, त्याचें गोत्र जमदग्नी, सामवेद, कुलदेवता

शालिग्राम, देवक आवाडा, पांचपालवी, व वड, नगर काशीखंड, गड संकाचन; विजयादशमीस खांडा पूजा; आभरण, भूषण, सिंहासन, छत्र, घोडा, निशाण हीं सर्व लाल असून, ध्वजीं श्वेतथाप. आतां याचे जातिभेद.—१ जगताप, २ तोवर, ३ काटकर, ४ शेळके, ५ शेळमकर, ६ गाडेकर, ७ सरजेराव, ८ गाडे, ९ गागोडे, १० वानबिरे, ११ मरुमकर, १२ धुमाळे, १३ नाडे. येणेंप्रमाणें कटक ( जगताप ) याचे जातिभेद जाणून, लग्नकार्य वगैरे जें करणें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्र धर्माप्रमाणें वर्तणूक करणें.

## करटपाळादि पुत्र ३–४–५–६.

आतां तिसरा पुत्र करटपाळ, चवथा वंशपाळ, पांचवा सकूर, व सहावा हेमाडराज या चौघांचें गोत्र, वेद, कुलदेवता, विजयादशमीस शस्त्रपूजा, भूषणादि गोत्रें ह्मणजे जातिभेद वगैरे सर्व शिंदे याचेप्रमाणें जाणावें. आतां सातवा पुत्र लाड याचें गोत्र अगस्ती, सामवेद, देवक पांच पालवी, विजयादशमीस तरवार पुजणें, कुलदेवता जोतिबा. आतां याचे जातिभेद— १ लाडक, २ सुरेकर, ३ ढामसे, ४ वयाळे, ५ चेके, ६ अभीरे, ७ सागे, ८ सपुंळे, ९ कब्रे, १० चौधारे, ११ पांडे, १२ खोमणे, १३ इतापे, १४ क्षीरसागर. येणेंप्रमाणें लाड याचे जातिभेद जाणन विवाह वगैरे जें करणें तें करावें. यज्ञोपवीत घालणें व क्षात्रधर्माप्रमाणें वर्तणूक करणें. शेपवंशीं आडनांव चुकलें असेल तेथें सिंदा, हें आडनांव जाणावें व या वंशीं जें गुरुगोत्र कळलें नसेल, तेथें कश्यप गोत्र जाणावें; आणि या वंशांतील शंक महाराजानें नीरानदीचे तीरीं देवनळेसी राज्य केलें, येथून पांचवे वंशापुढें म्लेंछादि संकरजाती होतील, असें जुने पुस्तकीं लिहिलें आहे. स्कंद पुराणांतील सह्याद्रिखंड अध्याय ३१।३२ यांत, चंद्रवंशीय राजांचीं गोत्रें व कुलदेवता दिल्या आहेत, त्या खालीं लिहिल्याप्रमाणें.—

१ गोत्र पद्माक्ष, योगेश्वरी कुलस्वामिनी. पद्मराजापासून दक्षराजापर्यंत एकंदर राजे २९.

२ च्यवन गोत्र, महालक्ष्मी कुलस्वामिनी. शामराजापासून नाममाली राजापर्यंत एकंदर राजे १९.

३ गोत्र गौतम, एकवीरा कुलदेवता. पृथुराजापासून पद्मभूपतीपर्यंत एकंदर राजे २४.

४ गोत्र कौंडिन्य, कालिका कुलस्वामिनी. श्रीधरराजापासून सात्विकीराजापर्यंत एकंदर राजे २४.

५ गोत्र सौनल, कुलदेवता पद्मावती. ब्रह्मराजापासून लोलिंब राजापर्यंत एकंदर राजे २८.

६ गोत्र चंपक, कुलदेवता कुमारिका. चंपकराजापासून मीनकेतन-राजापर्यंत एकंदर राजे ३४.

७ कुल ( गोत्र ) कश्यप, कुलदेवता कामाक्षी. शार्ङ्गराजापासून क्षेमराजापर्यंत एकंदर राजे २०.

८ कुल ( गोत्र ) वसिष्ठ, जगदंबा कुलदेवता. नीलराजापासून दिव्य-कांतराजापर्यंत एकंदर राजे १४.

दिव्यकांतं ततः प्राप्य नष्टोऽयं वंशविस्तरः॥
ततो वंशः प्रातिलोम्यादनुलोम्यात्तथैव च ॥ ५९ ॥
जातो वै वंशविस्तारो येन व्याप्तं महीतलम् ॥

इति श्रीस्कंदपुराणे आदिरहस्ये सह्याद्रिखंडे ईश्वरगणेशसंवादे सोमवंशोत्पत्तिकथनं नाम ह्येकत्रिंशत्तमोध्यायः ॥ ३१ ॥

याचप्रमाणें गोत्रकुलादिकांचा विचार, तिसाव्या अध्यायांतही आहे.

९ कुल ( गोत्र ) विश्वामित्र, सरस्वती कुलदेवता. विद्युत्पत्ति राजापासून जीवराजापर्यंत. पुढें हा वंश नष्ट झाला.

" आनुलोम्यप्रातिलोम्यात्तस्य वंशोभवत्किलेत्युक्तत्वात् ॥ "

१० कुल ( गोत्र ) भृगु, उमा कुलदेवता. रघुराजापासून गांगराजा-पर्यंत.

११ मागध राजासही अत्रि गोत्र, वागेश्वरी कुलदेवता. मागधापासून कांति राजापर्यंत. यामध्यें पंगु राजाचें आख्यान सांगितलें आहे. अध्याय ३२.

१२ कुल ( गोत्र ) भारद्वाज, ललितादेवी कुलदेवता. शैलराजापासून द्रुमराजापर्यंत.

× × × ततो नष्टोन्वयोभवत् ॥
मुख्य वंशे समुच्छिन्ने प्रतिलोमानुलोमत : ॥ ६ ॥
वंशो विस्तारतां यातो कलौ दुष्टो भवत्किल ॥

१३ कुल ( गोत्र ) हिरण्य, कुलदेवता हिरण्या. मानसराजापासून ऐरावतराजापर्यंत.

१४ कुल ( गोत्र ) हारित, कुलदेवता चंडिका. श्रीपतिराजापासून बुधराजापर्यंत.

१५ कुल ( गोत्र ) देवराज, कुलदेवता रेणुका. शैलराजापासून मालिवंतराजापर्यंत. नष्टोभूद्वंशविस्तर : ॥

१६ कुल ( गोत्र ) भूचंडाख्य, कुलदेवता महाकाली. नकुलराजापासून शत्रुतापनराजापर्यंत.

वर सांगितलेले राजे मोठे कीर्तिमान् झाले व यांचा पुष्कळ वंशविस्तार झाला.

१७ कुल ( गोत्र ) अंगिरा, कुलदेवता तामसा. दमनराजापासून सात्यकीपर्यंत. हे राजे देवी व ब्राह्मणभक्त झाले. पुढें—
प्रतिलोमानुलोमाभ्यां वंशो विस्तारतां गत : ॥ ४१ ॥.

१८ कुल ( गोत्र ) गार्ग्य, कुलदेवता इंद्राणी. शैलराजापासून भद्राश्वराजापर्यंत. हे राजे धर्मपालक व पराक्रमी झाले.

१९ कुल ( गोत्र ) मांडव्य, कुलदेवता ब्रह्माणी. भूरथराजापासून

[library stamp]

वैदर्भराजापर्यंत. या राजाच्या बंध्वादिकोंच्या वंशांनीं पृथ्वी भरली होती; परंतु कलियुगांत पातक झाल्यानें, क्रमानें तो वंश क्षीणतेस पोंचला.

२० कुल ( गोत्र ) सौनल्य, कुलदेवता पद्मावती. यदुराजापासून बलिराजापर्यंत. हे राजे देवतुल्य पराक्रमी झाले.

२१ कुल ( गोत्र ) पार्श्वत, कुलदेवता नीलांबा. पौंड्रकराजापासून बृहदश्वराजापर्यंत.

उक्तेभ्योन्येपि संजाता ऋषिगोत्रसमुद्भवाः ॥
अत्यद्भुताः करयुताः शस्त्रविद्याविशारदाः ॥

२२ कुल ( गोत्र ) प्रियऋषि, कुलदेवता कोलांबा. जघनराजापासून चंडराजापर्यंत.

एवमन्येपि भूपाला जाता विस्तरतां गताः ॥

२३ कुल (गोत्र ) वृद्धविष्णु, कुलदेवता अंबा. मन्मथराजापासून कीर्तिमालिराजापर्यंत.

२४ कुल ( गोत्र ) वैवस्वत, कुलदेवता वागेश्वरी. पारसीनामकराजापासून गुणशालिराजापर्यंत. हे राजे क्षात्रधर्मांचें संरक्षण करणारे झाले.

२५ कुल ( गोत्र ) भद्रऋषि, कुलदेवता रक्ताक्षी. रंधकराजापासून हेममालीराजापर्यंत.

२६ कुल ( गोत्र ) कृपाणमुनि, कुलदेवता महादेवी. प्रद्योषराजापासून शत्रूतापनराजापर्यंत.

एवमाद्यास्तु राजानो वीर्यवंतो धृतव्रताः ॥
आसमुद्रां महीमेतां पालयित्वा दिवं गताः ॥ ९९ ॥

२७ वंश ( गोत्र ) चामरमुनि, वंशदेवता तामसी. शशीराजापासून धर्मराजापर्यंत. या वंशाची कलियुगांत अतिवृद्धि झाली नाहीं.

२८ वंश ( गोत्र ) मार्तंड, वंशदेवता वज्रिणी. दानराजापासून मेघनादराजापर्यंत.

२९ वंश ( गोत्र ) दाल्भ्यमुनि, वंशदेवता मातृनंदा. सारंगराजापासून वीरबाहुराजापर्यंत. या वंशांतील राजे शस्त्रजीवी व विद्याजीवी असे झाले.

३० वंश ( गोत्र ) पूतिमाक्ष, वंशदेवता लीलादेवी. वज्रदंष्ट्रराजापासून कामाक्षराजापर्यंत.

३१ वंश ( गोत्र ) जांबीलमुनि, वंशदेवता जलवेध्या. देवराजापासून कृतवर्मापर्यंत.

३२ वंश ( गोत्र ) गणक, वंशदेवता मातृकादेवी. मंत्रोद्भवराजापासून धर्मवर्धनराजापर्यंत.

३३ वंश ( गोत्र ) वैरूक्ष, वंशदेवता मोहिनी. श्रीपालराजापासून कामपालीराजापर्यंत.

३४ वंश ( गोत्र ) वैतन, वंशदेवता भद्रा. मयूरध्वजराजापासून कमलाकरराजापर्यंत.

३५ वंश ( गोत्र ) जमदग्नी, वंशदेवता उर्शिला. शूरसेनराजापासून वीरपाणीराजापर्यंत.

३६ वंश ( गोत्र ) भानुमुनि, वंशदेवता योगेश्वरी. नृहरिराजापासून चंपकराजापर्यंत. चंपकापासून पुढें पुष्कळ संतति झाली.

३७ वंश ( गोत्र ) सोममुनि, वंशदेवता अरुणा. मंदुकराजापासून यदुवृद्ध राजापर्यंत.

३८ वंश ( गोत्र ) नानाभिमुनि, वंशदेवता वरणाक्षी. भार्गवराजापासून दमिलराजापर्यंत.

३९ वंश ( गोत्र ) दुंदुभिऋषि, वंशदेवता कराला. सुग्रीवराजापासून सुरकंद राजापर्यंत.

४० वंश ( गोत्र ) गोपमुनि, वंशदेवता चंपावती. चैत्रराजापासून विचक्षणराजापर्यंत.

४१ वंश ( गोत्र ) कुमारऋषि, वंशदेवता दुर्गादेवी. धर्मराजापासून भूरिवर्षराजापर्यंत.

४२ वंश ( गोत्र ) कुमारमुनि. वंशदेवता ईश्वरी. शूनकराजापासून धृष्टद्युम्नराजापर्यंत.

४३ वंश ( गोत्र ) मित्रमुनि, वंशदेवता वीरेश्वरी. शाश्वतराजापासून गोपतीराजापर्यंत.

४४ वंश ( गोत्र ) मंडनऋषि, वंशदेवता षड्गुणी. दानराजापासून धर्मगोप्ताराजापर्यंत.

४५ वंश ( गोत्र ) बकदाल्भ्यमुनि, वंशदेवता पाटला. शाल्मद्वीराजापासून तेजोराशीराजापर्यंत.

४६ वंश ( गोत्र ) रोमहर्षमुनि, वंशदेवता त्वरिता. जयवान्राजापासून पारिजातराजापर्यंत.

४७ वंश ( गोत्र ) कूर्मऋषि, वंशदेवता मालमालिनी. प्राणनाथराजापासून वीरसेनराजापर्यंत.

४८ वंश ( गोत्र ) सुकुमार, वंशदेवता मुंजादेवी. विदर्भराजापासून वीरभद्रराजापर्यंत.

४९ वंश ( गोत्र ) सावनऋषि, वंशदेवता माहेश्वरी. वैजयंतराजापासून कर्णराजापर्यंत.

५० वंश ( गोत्र ) माल्यवंतऋषि, वंशदेवता कात्यायनी. पार्थिवराजापासून व्यापकराजापर्यंत.

५१ वंश ( गोत्र ) चित्रमुनि, वंशदेवता कात्यायनी. भोरिसेनराजापासून अरुणराजापर्यंत.

इति श्री स्कंदपुराणे आदिरहस्ये सह्याद्रिखंडे त्रयस्त्रिंशत्तमोध्यायः

५२ वंश ( गोत्र ) अंतरिक्षऋषि, वंशदेवता अप्सरादेवी. द्रुपद-राजापासून हंसकेतुराजापर्यंत.

५३ वंश ( गोत्र ) मुद्गलऋषि, वंशदेवता दाडिमा. वासुकीराजा-पासून भीरुराजापर्यंत.

५४ वंश ( गोत्र ) पारिजातऋषि, वंशदेवता वंदना. कीर्तिमान्-राजापासून दुर्मर्षणराजापर्यंत.

५५ वंश ( गोत्र ) पार्णव, वंशदेवता वैष्णवी. मुखरराजापासून जितारिराजापर्यंत.

५६ वंश ( गोत्र ) अगस्ती, वंशदेवता उग्रिणी. वासुदेवराजापासून हरिभक्तराजापर्यंत.

५७ वंश ( गोत्र ) शाल्मली, वंशदेवता मोहिनी. अतिमारराजा-पासून धुंधुमारराजापर्यंत.

५८ वंश ( गोत्र ) अलायुऋषि, वंशदेवता सुपर्णा. सुदेष्णराजा-पासून अभ्रमालीराजापर्यंत.

५९ वंश ( गोत्र ) भोमऋषि, वंशदेवता भैरवी. रुक्मरथराजापासून मदपराजापर्यंत.

६० वंश ( गोत्र ) महातपमुनि, वंशदेवता भामिनी. सुरथराजा-पासून रिपुमर्दनराजापर्यंत.

६१ वंश ( गोत्र ) उपमन्यु, वंशदेवता जातिका. आदिराजापासून अचिरायुराजापर्यंत.

६२ वंश ( गोत्र ) शांडिल्य, वंशदेवता सौमिनी. महाराजापासून अचिंपराजापर्यंत.

६३ वंश ( गोत्र ) विभांडक, वंशदेवता दलिनी. अरिमर्द्दराजापासून पद्माक्षराजापर्यंत.

६४ वंश ( गोत्र ) धार्मिक, वंशदेवता दैत्यनाशिनी. प्रीतिमानराजा-पासून अग्निसवीराजापर्यंत.

६५ वंश ( गोत्र ) सात्त्विक. वंशदेवता प्रभावती. सहस्रजित्राजापासून सुछायराजापर्यंत.

६६ वंश ( गोत्र ) ब्रह्मर्षि, वंशदेवता शिला. चित्ररथराजापासून अंगदराजापर्यंत.

६७ वंश ( गोत्र ) जनार्दन, वंशदेवता बागला. सीमंतराजापासून प्रभाचिराजापर्यंत.

६८ वंश ( गोत्र ) विमलाख्य, वंशदेवता भामिनी. गजराजापासून मेघनादराजापर्यंत.

६९ वंश ( गोत्र ) त्रातृ, वंशदेवता अमरा. महीधरराजापासून निकुंभराजापर्यंत.

७० वंश ( गोत्र ) वारणाख्यऋषि, वंशदेवता चित्ररेषा. श्वेतराजापासून बलवृद्धराजापर्यंत.

७१ वंश ( गोत्र ) उग्रमुनि, वंशदेवता शक्तिदेवी. सुक्षेत्रराजापासून रमाक्रीडराजापर्यंत.

७२ वंश ( गोत्र ) प्रेमाख्यऋषि, वंशदेवता सोमेश्वर. स्वर्णबाहुराजापासून मणिकुंडलराजापर्यंत.

७३ वंश ( गोत्र ) भाषणाख्यमुनि, वंशदेवता महामारी. श्रीधरराजापासून मालीमंडनराजापर्यंत.

७४ वंश ( गोत्र ) नभोऋषि वंशदेवता ललिनी. प्रजापालनराजापासून चित्रांगदराजापर्यंत.

७५ वंश ( गोत्र ) वायुऋषि, वंशदेवता पन्नगेश्वरी. सुविद्वान्राजापासून शशिबिंदुराजापर्यंत.

७६ वंश ( गोत्र ) वामकऋषि, वंशदेवता त्रिपुरा. कामदराजापासून अंगराजा ( चंपकनगरीचा स्वामी ) वंग राजा ( माहिष्मती नगरीचा स्वामी ) द्रविडेश्वरराजापर्यंत.

७७ वंश ( गोत्र ) प्रायणाख्यऋषि, वंशदेवता अंतभैरवी. वेदवाद राजापासून पक्षजित्राजापर्यंत.

मुख्यवंशे समुच्छिन्ने नीचयोनौ स्थितोऽभवत् ॥
वंशोऽयं हि गुणाध्यक्ष : कलिकाले समागते ॥
वंशो व्याससमासाभ्यां मयोक्तः कुलनंदन ॥६७ ॥

इति श्रीस्कंदपुराणे आदिरहस्ये सह्याद्रिखंडे व्याससनत्कुमारसंवादे क्षत्रियोत्पत्तिकथनं नाम चतुस्त्रिंशत्तमोध्याय: ॥ ३४ ॥

महादेवउवाच.—अत: परं प्रवक्ष्यामि संस्थां धर्मस्य तत्वत: ।
अयोध्यायां पुरा संस्था ततश्चोत्तरतस्तथा ॥ १ ॥

ततश्च पैठने प्रोक्ता प्राप्ते कलियुगे सति ।
भृगुशापाद्गतं राज्यं गतशौर्यं गुणाधिप ॥ ५ ॥

गते राज्ये तत: सर्वे वसिष्ठो मुनिपुंगव: ।
कोंकणे च भवेत्संस्था प्राप्ते कलियुगे सति ॥ ६ ॥

भवेन्निंदां करिष्यंति लोका: पापविमोहिता: ।
कूटयुक्तिरताश्चैव मिथ्यावादपरायणा: ॥ ७ ॥

द्विजनिंदापराश्चैव शास्त्रनिंदापरास्तथा ।
त्रेतायुगे गुरुश्रेष्ठं वसिष्ठं तापसं मुनिम् ॥ ८ ॥

सूर्यवंशे नृपा: सर्वे पूजयंति गुणोपमा: ।
कलौ युगे च संप्राप्ते महीं पापपरायणाम् ॥ ९ ॥

सर्वे च ऋषयस्त्यक्त्वा गतास्ते बद्रिकाश्रमे ।
ततो वसिष्ठराजर्षिर्नृपान् सर्वांस्तदाऽब्रवीत् ॥ १० ॥

मदुक्तं चावधार्यं वै भवद्भि: सर्वसम्मते: ।
मत्संमताद्भवद्भिश्च क्रिया कार्या विचक्षणै: ॥ ११ ॥

मम वंशकुले जाता मम गोत्रसमुद्भवा: ।
मां गुरुं मानयेत्सर्वान् पूजयेद्विधिपूर्वकम् ॥ १२ ॥

यजुःशाखास्यकर्माणि सूत्रं कात्यायनं स्मृतम् ।
स्वकर्मश्रुतिसंयुक्तं कुर्याद्राज्यं यथाविधि ॥ १३ ॥
इत्युक्त्वा मुनिवर्योसौ ह्यंतर्धे मुनिसत्तमः ।

इति श्रीस्कंदपुराणे आदिरहस्ये सह्याद्रिखंडे पाठारीयधर्मोत्पत्तिकथनं नाम षट्त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३६ ॥

धर्मसिंधूंतील क्षत्रियांबद्दल गोत्रप्रमाण. "क्षत्रियवैश्यौ तु पुरोहितगोत्रप्रवराविति सर्वसिद्धांतः ।" अर्थ—क्षत्रिय व वैश्य हे पुरोहितगोत्रप्रवरी आहेत, असा सर्व सिद्धांत जाणावा. ( धर्मसिंधु पत्र ३७७ ).

॥ क्षत्रियाणां हि पुरोहितभेदेन गोत्रभेदः ॥ तेन यदुवंशेषु परस्परं विवाहः ॥ ( धर्मसिंधु पृष्ठ ४७८. )

## मराठे यांचीं ९६ कुळें खालीं लिहिल्याप्रमाणें.

१ अहिरराव ( ऊर्फ राव ), २ अंग्रे, ३ इचारे, ४ इंगळे, ५ कदम, ६ काकडे, ७ कानडे, ८ काळे, ९ केसरकर, १० कोकाटे, ११ खडतरे, १२ खराटे, १३ खंडागळे, १४ खानवेलकर ( ऊर्फ राणे ), १५ खांडेकर, १६ गव्हाणे, १७ गाताड, १८ गायकवाड, १९ गुजर ( ऊर्फ पवार ); २० गोळे, २१ गौळी, २२ घाटगे, २३ घोरपडे ( ऊर्फ भोसले ), २४ चाळके, २५ चिनगे, २६ जगताप, २७ जगदळे, २८ जगधने, २९ जाधव, ३० जावळी, ३१ टेकळे, ३२ डफळे, ३३ ढमढेरे, ३४ ढवळे, ३५ ढोणे, ३६ तावसे, ३७ तेजे, ३८ थोटे, ३९ थोरात, ४० दळवी, ४१ दरेकर, ४२ दाभाडे, ४३ देवमाने, ४४ देवराव, ४५ धायवर, ४६ धुमाळ, ४७ धुळप, ४८ नलवडे ( नाइकवाडे, नाणेकर ), ४९ निंबाळकर, ५० निसाळ, ५१ पाटणकर, ५२ पाठारे, ५३ पानसरे, ५४ पिसाळ, ५५ पिंगळे, ५६ फडतरे, ५७ फाळके, ५८ बाबर, ५९ भागवत, ६० भालेराव, ६१ मिसे, ६२ भोइटे, ६३ भोवारे,

६४ भोंसल ( ऊर्फ सिसोदे ), ६५ मळके, ६६ महाडिक ( ऊर्फ हंडे ), ६७ महिपाळ, ६८ माणकर, ६९ माने, ७० मालुसरे, ७१ मोरे, ७२ मोहिते ( ऊर्फ चव्हाण ), ७३ ह्मावर, ७४ यादव, ७५ रणनवरे, ७६ रसाळ, ७७ राऊत, ७८ राजमाने, ७९ रेणुसे, ८० वाघ, ८१ वाळके, ८२ विसाटे, ८३ शेटके, ८४ शेळके, ८५ शितोळे, ८६ शिंदे, ८७ शिरके ( ऊर्फ तुवार ), ८८ शेलार, ८९ शंखपाळ, ९० सांबारे, ९१ सावंत, ९२ साळुंखे, ९३ सूर्यवंशी ( सूर, सुर्वे. ), ९४ हरफळे, ९५ हिरवे, ९६ क्षीरसागर.

या ९६ कुळांतही १ भोंसले ( ऊर्फ सिसोदे ), २ शिरके ( ऊर्फ तुवार ), ३ मोहिते ( ऊर्फ चव्हाण ), ४ महाडिक ( ऊर्फ हंडे ), ५ खानवेलकर ( ऊर्फ राणे ), ६ गुजर ( ऊर्फ पवार ), आणि ७ अहिरराव ( ऊर्फ राव ) हीं मुख्य सप्तकुळें आहेत. ( ही माहिती लोकहितवादीकृत ‘ स्वाध्याय ’ ग्रंथांत लिहिली आहे, त्याचा हा उतारा ).

स्कंदपुराण सह्याद्रिखंड अध्याय २७ यांत, श्लोक १८ पासून सूर्यवंशाचीं गोत्रें व कुलदेवता दिल्या आहेत; त्या येथें खालीं लिहिल्याप्रमाणें जाणाव्या.

१ भारद्वाज, २ पूतमाक्ष, ३ वसिष्ठ, ४ कश्यप, ५ हारीत, ६ वृद्धविष्णु, ७ ब्रह्मा, ८ जनार्दन, ९ सौनल्य, १० कौंडिन्य, ११ मांडव्य, १२ कौशिक ( विश्वामित्र ) हीं सूर्यवंशीय राजांचीं बारा गोत्रें समजावीत. आतां कुलदेवता—१ प्रभावती, २ कालिका, ३ चंडिका, ४ महालक्ष्मी, ५ योगीश्वरी, ६ इंद्राणी, ७ कामाक्षी, ८ एकवीरा, ९ अंबिका, १० माहेश्वरी, ११ दुर्गा १२ त्वरिता. येणेंप्रमाणें सूर्यवंशीय राजांच्या कुलदेवता जाणाव्या.

आतां स्कंदपुराण सह्याद्रिखंड अध्याय ३० श्लोक २७ पासून

द्रवंशीय राजांचीं गोत्रें व कुलदेवता सांगितल्या आहेत. त्या खालीं हिल्याप्रमाणें जाणाव्यात.

१ पद्माक्ष, २ नव, ३ गौतम, ४ कौंडिन, ५ सौनल्य, ६ चंपक, ७ सेष्ठ, ८ कश्यप, ९ विश्वामित्र, १० भृगु, ११ भरद्वाज, १२ अत्रि, १३ रण्य, १४ हारीत, १५ देवराज, १६ मृकंडु, १७ अंगिरा, १८ गर्ग, ९ मांडव्य, २० शौनक, २१ भद्र, २२ कृपायु, २३ शूलक, २४ लचामर, २५ मार्तंड, २६ विश्वावसु, २७ दाल्भ्य, २८ पूतिमाष, ९ जांबीलगणक, ३० वैरुक्ष, ३१ वैतस, ३२ जमदग्नी, ३३ भावन, ४ सौमन, ३५ अभिदुंदुभि, ३६ द्राविण, ३७ गोपकुमार, ३८ त्रेय, ३९ मंडन, ४० बकदाल्भ्य, ४१ रोमाण, ४२ कुमार, ३ भावनि, ४४ मालिवंत, ४५ अग्निक्ष, ४६ मुद्गल, ७ पारिजात, ४८ दामोदर, ४९ साल्यन, ५० पार्थप, ५१ चारणाक्ष, २ अंबष्ठ, ५३ ऋषिभावन, ५४ सोमकांत, ५५ भीम, ५६ चमक, ७ प्रात. याप्रमाणें चंद्रवंशीयराजांचीं गोत्रें ५७.

## कुलदेवता.

१ योगेश्वरी, २ महालक्ष्मी, ३ एकवीरा, ४ कालिका, ५ कुमारी, कामाक्षी, ७ अंबिका, ८ सरस्वती, ९ उमा, १० वागीश्वरी, ११ लेता, १२ हरिणाक्षिका, १३ चंडिका, १४ रेणुका, १५ महाकाली, ६ तालिका, १७ इंद्राणी, १८ वज्रिणी, १९ ब्राह्मी, २० पद्मावती, १ नीलांबा, २२ कोलांबा, २३ अंबा, २४ नागेश्वरी, २५ रक्ताक्षी, ६ विजया, २७ महादेवी, २८ तामसी, २९ सुनंदा, ३० पूतिमाक्षी, १ नीला, ३२ जलेश्वरी, ३३ मातृका, ३४ मातृनंदा, ३५ मालिनी, ६ उर्मिला, ३७ अरुणा, ३८ अरुणाक्षी, ३९ कुरुला, ४० पानमालिनी, ४१ चंपावती, ४२ दुर्गा, ४३ ईश्वरी, ४४ विरहेश्वरी, ४५ शार्ङ्गी, ४६ पाठला, ४७ त्वरिता, ४८ मालमालिनी, ४९ मुंजा,

५० माहेश्वरी, ५१ चित्रा, ५२ कात्याका, ५३ अप्सरा, ५४ दाडिम, ५५ भद्रिका, ५६ वैष्णवी, ५७ उग्रिणी, ५८ मोहिनी, ५९ सुवर्णाक्षी, ६० भैरवी, ६१ भामिनी, ६२ जातिका, ६३ सौमनी, ६४ दलिनी, ६५ दैत्यनाशिनी, ६६ प्रभावती, ६७ शीलांजा, ६८ बगिला, ६९ भामिनी, ७० अमरा, ७१ पार्वती, ७२ शक्ति, ७३ सोमेश्वरी, ७४ महामारी, ७५ तुलादेवी, ७६ बालणा, ७७ पन्नगेश्वरी, ७८ त्रिपुरा, ७९ कामाक्षी, ८० चित्रज्वाला, ८१ विशेश्वरी, ८२ सप्पर, ८३ विजुली, ८४ बालांधा.

येणेंप्रमाणें चंद्रवंशीय राजेलोकांच्या कुलदेवता जाणाव्यात.

इति श्रीस्कंदपुराणे सह्याद्रिखंडे त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ३० ॥

श्री.

※ आलीकडे मराठे मंडळीचीं प्रचारांत असलेलीं आडनांवें खालीं लिहिल्याप्रमाणें, व लग्नकार्याचेवेळीं देवकांत पंचपल्लव वगैरे कोणती वस्तु स्थापन करणेचे, तेही खालीं लिहिलेप्रमाणें जाणावें.

१ अंतराळे, २ अन्वाळे, ३ अल्पाटे, ४ अक्ताटे, ५ अवलकरा, ६ आगलावे, ७ आडकारे, ८ आडसूळ, ९ आर्चाले, १० आ[illegible]णें, ११ आहेसाव, १२ इमालकर, १३ इंगवले, १४ इंगळे, १५ इ[illegible], १६ इंदूलकर, १७ इपारे, १८ उडुगे, १९ उद्रे, २० उपलक[illegible], २१ उपार, २२ उक्षीकर, २३ कंक, २४ कचरे, २५ कणाय, २६ कदम, २७ कबाडे, २८ कमटे, २९ कर्पे, ३० कवलका[illegible], ३१ कवंड, ३२ काकडे, ३३ काटे, ३४ कांडर, ३५ काथकर, ३६ काथवटे, ३७ कांबळे, ३८ काभटे, ३९ कामेकर, ४० का[illegible] शिड, ४१ काळे, ४२ किरद, ४३ किरटेकर, ४४ किरदत्त, ४[illegible]

※ रा० सा० बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं केलेल्या ग्रंथाधारें लिहिलें आहे.

वडे. ४६ केंसकर. ४७ केसरे, ४८ कोकोट, ४९ कोडग
५० कोडगे, ५१ कोरे, ५२ कोल्टे, ५३ कोणसे, ५४ खरडेकर, ५५
खराडे, ५६ खळे, ५७ खले, ५८ खाकले, ५९ खाडे, ६० खांडेकर,
६१ खालविलकर, ६२ खांबकर, ६३ खालवटे, ६४ खिरसागर, ६५
खुळे, ६६ खेडर, ६७ खोकडे, ६८ खोडक, ६९ खोपकर, ७० खोळे,
७१ गरजे, ७२ गरड, ७३ गवस, ७४ गवसेकर, ७५ गवळी,
७६ गाईकवाड, ७७ गाजरे, ७८ गिरजे, ७९ गिड्डु, ८० गुजर,
८१ गुजाळ, ८२ गुंजाळ, ८३ गेळे, ८४ गोजरे, ८५ गोरे, ८६
घोडशी, ८७ घाइळ, ८८ घाडगे, ८९ घारगे, ९० घुग्रे, ९१
घुटुगेड, ९२ घुरे, ९३ घुळे, ९४ घोगाणे, ९५ घोगे, ९६ घोडके,
९७ घोरपडे, ९८ घोळप, ९९ चव्हाण, १०० चापटे, १ चावट,
२ चाळखे, ३ चिखले, ४ चितुक, ५ चेंडे, ६ चौधरे, ७ छत्रे,
८ जगताप, ९ जगदाळे, ११० जटापटे, ११ जगदाडे, १२ जमेदार,
१३ जरतारे, १४ जाधव, १५ जिंजुरटे, १६ जतवडेकर, १७
जुगदार, १८ जुवेकर, १९ जोशी, १२० झांबरे, २१ टाकेकर,
२२ ठमके, २३ ठाणेकर, २४ ठोपर, २५ ठोंबरे, २६ डफळे,
२७ डसाले, २८ डेंगडे, २९ डोंगरें, १३० ढगे, ढिसाळ, ३१
ढकणे, ३२ ढेमरे, ३३ ढेरे, ३४ ढोपरे, ३५ तनपुरे, ३६
ताकवडेकर, ३७ ताटे, ३८ तादुकडे, ३९ ताडसरे, १४०
तावडे, ४१ तावरे, ४२ तिकाडे, ४३ तिरवे, ४४ तिग्रे, ४५
तिपये, ४६ तिवटे, ४७ तेलवेकर, ४८ तोटर, ४९ तोरस्कर, १५० तोरे, ५१ थोरबोले, ५२ थोरवड, ५३ थोरात, ५४
दंडवते, ५५ दगडे, ५६ दळवी, ५७ दाइंग्डे, ५८ दाढमोडे,
५९ दाभाडे, १६० दिडे, ६१ दिवथकर, ६२ दुबळ, ६३ दुबरे,
६४ देवकर, ६५ दोडफडे, ६६ धनवडे, ६७ धपुपसे, ६८ धमढेरे,

६९ घाईगुंडे, १७० घातुगडे, ७१ धाटव, ७२ धुमाळ, ७३ धुळप, ७४ ननवरे, ७५ नलगे, ७६ नलवडे, ७७ नवार, ७८ नाईक, ७९ नागटिळक, १८० नाटळे, ८१ नाहुके, ८२ नाल्हे, ८३ निकम, ८४ निगवेकर, ८५ नितवडे, ८६ निपरूळ, ८७ निंबाळकर, ८८ नोगदंड, ८९ पउले, १९० पगडे, ९१ पडळकर, ९२ पडवळे, ९३ पडियार, ९४ पंडिव, ९५ पन्हाळे, ९६ परब, ९७ पवार, ९८ पाधम, ९९ पाचुंदकर, २०० पाटणकर, पाटोळे, १ पाताडे, २ पांढरे, ३ पांबर, ४ पायगन, ५ पालकर, ६ पालव, ७ पिंगळे, ८ पिंपरे, ९ पिसाळ, २१० पुनुगड, ११ पेंढारी, १२ पोटे, १३ पोव्हळे, १४ फडतरे, १५ फराटे, १६ फसलकर, १७ फाकडे, १८ फावडे, १९ बडर, बने, २२० बरगे, २१ बरंगुले, २२ बाकर, २३ बागळ, २४ बांटे, २५ बाड, २६ बाडळ, २७ बांडे, २८ बाबर, २९ बावचीकर, २३० बागटकर, ३१ बावळे, ३२ बिचारे, ३३ बिचुकले, ३४ बिटले, ३५ बिरीकर, ३६ बिरामणे, ३७ बुरसे, ३८ बेडण, ३९ बेलांडे, २४० बोकडे, ४१ बोगर, ४२ बोटे, ४३ बोडे, ४४ बोराडे, ४५ भाकड, ४६ भागट, ४७ भाटमारे, ४८ भाडिरगे, ४९ भापकर, २५० भामे, ५१ भिउंगडे, ५२ भिंगारी, ५३ भिलारे, ५४ भुइकर, ५५ भुजबळ, ५६ भुजवर, ५७ भोइटे, ५८ भोगप, ५९ भोजक, २६० भोरे, ६१ भोसले. ६२ मगर, ६३ मंडलिक, ६४ मनव्हे, ६५ मरगळे, ६६ मरडे, ६७ मस्के, ६८ महागुरे, ६९ महाडिक, २७० मांडगुळे, ७१ मांडवकर, ७२ मांडवेकर, ७६ माणे, ७४ मारेकरी, मालप, २७५ मालुसरे, ७६ मिसाळ, ७७ मुंडेकर, ७८ मुदडे, ७९ मुळिक, २८० मेथे, ८१ मोरमाळे, ८२ मोहिते, ८३ मोळे [ रे ], ८४ यादव, ८५ येकरे, ८६ येवले, ८७ रकटे, ८८ रडतोंडे, ८९ रणदिवे,

२९० रणनवरे, ९१ रणसिंग, ९२ रवडे, ९३ रसाळे, ९४ रवळदे, ९५ रावूत, ९६ राजिगरे, ९७ राजमाने, ९८ राणे, ९९ रायजोदे, ३०० रेडेकर, १ रेडाळकर, २ रोटे, ३ लकुडे, ४ लघाटे, ५ लवाटे, ६ लहरे, ७ लागवणकर, ८ लाटवडे, ९ लाड, ३१० लांडगे, ११ लांडे, १२ लावंड, १३ लुगडे, १३ लंगसे, १५ लोंढे, १६ लोंबटे, १७ वगरे, वरोटे, १८ वाइभडे, १९ वांकडे, ३२० वाघ, २१ वाघमारे, २२ वाडकर, २३ वाडिंगे, २४ वापारे, २५ वारंगे, २६ वाळेकर, २७ विचारे, २८ वीर, २९ वेलवणकर, ३३० शंकर; ३१ शतफळे; ३२ शितोळे, ३३ शिंदे; ३४ शिपलकर, ३५ शिरके, ३६ शिरसवडे, ३७ शेंडे, ३८ शेलार, ३९ शेवाळे, ३४० शेळके, ४१ सताले, ४२ सन्मुख, ४३ सलगर, ४४ सवाशे, ४५ सांगळे, ४६ साठे, ४७ सातपुते, ४८ सातक, ४९ साबळे, ३५० सारंग, ५१ सालिभ, ५२ सावंत, ५३ साळवी, ५४ साळोखे, ५५ सिस्ते, ५६ सुपळ, ५७ सुपेकर, ५८ सूर्य, ५९ सुरवशी, ३६० सेराडे, ६१ सोनमुळे, ६२ सोनुगडे, ६३ सोमासे, ६४ सोले, ६५ हगवणे, ६६ हजारे, ६७ हांडे, ६८ हिंगे, ६९ हितापे, ३७० हिमणे, ७१ होताळे.

## देवकांत बसविणेचे पदार्थ.

१ दगडी आणि समुद्र मर्यादेचे वेल, २ वटवृक्ष, ३ पंकनिसाचें फळ, ४ कमळ, ५ सूर्यकांत आणि मंदार यांचीं फुलें, ६ कुंभारकुकडे आणि मोर याचीं पिसें, ७ पांच पालवी व तरवारीची धार.

येणेंप्रमाणें वर लिहिलेले वंश, शाखा व गोत्रें याचा पुरा शोध करून विवाह वगैरे करणेचें तें करावें. कारण, गोत्रांतले गोत्रांत व शाखेंतल्या शाखेंत विवाह झाल्यास, पुढें होणारी संतति चांडाळ होती, असें यमस्मृतींत सांगितलें आहे.

## उपसंहार.

हा क्षात्रवंशसागरनामक ग्रंथ अतिशय मेहनतीनें व पुष्कळ ग्रंथांच्या आधारानें करणेचें कारण कीं, सर्व मराठे लोकांनीं आपआपले जातिभेद व गोत्रें यांचा पूर्णपणें विचार करून, विवाहादि करावेत. याकरितां सर्वांस बोध होऊन वाचणेस यावें, ह्मणून हें प्राकृत पुस्तक तयार केलें आहे. तर सर्व लोकांनीं उपयोग करून घ्यावा, व घेतील अशी आशा आहे.

[ समाप्त. ]